५

एकंदरीने, विचारवंत म्हणून ओळखले जाणारे व स्वत:ही स्वत:ला विचारवंत म्हणवून घेणारे, अशांचा जो वर्ग आहे त्याची स्थिती व अवस्था काही शोभादायक नाही. समाजाशी असलेले त्यांचे नातेही जुजबी व उपरे आहे. समजा ही सारी मंडळी लिहायचे-बोलायचे थांबली तर? सुशिक्षित, पांढरपेशा, उच्च मध्यमवर्गाचे काही बिघडेल? त्यांच्या पानातले एक तोंडी लावणे कमी झाले, किंवा एक प्रकारची करमणूक उरली नाही असे बहुधा होईल. राज्यकर्ते, समाजधुरीण यांना अलीकडे भाषणे लिहून द्यायलाही विचारवंत लागत नाहीत असे दिसते. जनसामान्यांपासून यांची नाळ तुटलेली आहे. अगदीच फटकळ माणूस असेही जर म्हणाला की, 'आजचा विचारवंतांचा वर्ग हवा कशाला, काय मोठे असे योगदान त्याचे समाजाला आहे', तर काही सन्माननीय अपवाद वगळता, त्याचे म्हणणे खोडून काढणे शक्य आहे का?

ही काही चांगली स्थिती नाही. कारण विचारवंतांचा एक सक्रीय वर्ग नसला, समाजाला जागे करण्याचे, ठेवण्याचे काम करणारा, समाजात नीतिमत्तेचे, गुणवत्तेचे, सच्चेपणाचे मानदंड निर्माण करण्याचे व टिकवून धरण्याचे काम पार पाडणारा, समाजहिताचे प्रश्न व समाजापुढील आव्हाने सतत डोळ्यांपुढे धरणारा वर्ग नसला तर समाजाचा निश्चितच ऱ्हास होतो. तसा तो आपल्या डोळ्यांदेखत झालेला आहे, त्याला एक वेगही आला आहे.

विचारांच्या क्षेत्रात लहानमोठे कार्य करणाऱ्या, विचारांविषयी आस्था असणाऱ्या मंडळींनी विचारांच्या क्षेत्रातील शोचनीय परिस्थिती सुधारण्याचे काम अंतर्मुख होऊन प्रथमत: हाती घ्यायला हवे आहे. ही गोष्ट विचारवंतांची एक संघटना बांधून वा पक्ष स्थापन करून मागण्या सादर करून व त्या पदरात पाडून घेण्याचे राजकारण करून साध्य होणारी नाही. वैयक्तिक व छोट्या समूहांच्या पातळीवर चोख, कसदार विचार करावयास लागणे हा एक मार्ग आहे. आपल्या सहविचारवंतांच्या वैचारिक कृतींची चोख समीक्षा करणे, व एक अंतर्गत जिवंत चर्चा उपस्थित करणे हा दुसरा मार्ग आहे. लोकांमध्ये जाऊन विचार त्यांच्यासह करणे हा तिसरा मार्ग आहे.

नवभारत, ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००६

(हा मूळ लेख 'निबंध' म्हणून १२ जानेवारी १९९७ रोजी महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने मराठी वैचारिक साहित्यावर पुणे येथे झालेल्या चर्चासत्रात सादर केला होता. मार्च/एप्रिल १९९७च्या नवभारतच्या अंकातही तो छापला होता. त्याचे पुनर्मुद्रण ऑक्टोबर-नोव्हेंबर २००६च्या अंकात केले होते.)

◆

VP0029

विवाह : एक सामाजिक-सांस्कृतिक निर्मिती

१

लग्नाची प्रथा व संस्था ही मानवाने केलेली एक सामाजिक-सांस्कृतिक निर्मिती आहे याविषयी एकमत आहे. ही प्रथा मुळात कशी अस्तित्वात आली ही गोष्ट हे आजही गूढ आहे, व बहुधा नेहमीकरताच ते एक गूढच राहील. जगभरच्या आदिवासी टोळी समाजाचा अभ्यास केल्याने हे कोडे उकलेल अशी शक्यता नाही. ही गोष्टही अनेकानेक समाजांच्या अभ्यासांवरून एव्हाना पुरेशी स्पष्ट झालेली आहे.

केवळ एक प्राणिजाती म्हणून जर विचार केला तर, वंशसातत्य टिकवून धरण्यासाठी मानवी टोळ्यांमध्ये लग्नाची प्रथा पडण्याची, निर्माण होण्याची अटळ आवश्यकता होती असे काही दिसत नाही. माणसाच्या जवळपास येणाऱ्या वानर जातींपैकी कोणत्याही जातीचे लग्नप्रथेवाचून काही अडलेले नाही. माणसाचेच कोठे व का अडले असेल? या प्रश्नाची सर्वच उत्तरे ही एका अर्थी कपोलकल्पितच असणार, आधुनिक वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून यांपैकी कोणतेही उत्तर सिद्ध करता येणार नाही. आणि तरीही असा प्रश्न विचारून त्याचे उत्तर देणे महत्त्वाचे आहे.

वानर, हत्ती, लांडगे, इत्यादी प्राण्यांचे, टोळीत कळप करून राहणाऱ्या प्राण्यांचे वर्तनही यमनियमांनी बांधलेले आढळते, त्यांचा अभ्यास करता येतो. अलीकडे प्राणिवर्तनशास्त्र (इथॉलॉजी) ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विकसित झाली आहे. प्राकृतिक अवस्थेतील विविध प्राणिकळपांचे अभ्यास करून लिहिलेली मनोरंजक व उद्‌बोधक पुस्तके आज उपलब्ध झाली आहेत. या सर्व वेगवेगळ्या प्राण्यांचा परस्परांशी व्यवहार घडत असताना, सभोवतालच्या वनस्पती व प्राणिसृष्टीशी, पर्यावरणाशी क्रिया-प्रतिक्रिया घडत असताना त्यांच्याकडून ज्या नियमांचे पालन होते, त्या नियमांची 'नियम' म्हणून त्या प्राण्यांना जाणीव असते, त्यांच्याविषयी

ते कोणत्याही प्रकारे खुलासा करू शकतात असे आढळत नाही. आपापसात त्यांच्या कधी बैठका भरतात, विचारविनिमय होतो असे आढळत नाही. माणसाचे वेगळेपण, तेही प्राणी म्हणून, असे आहे की जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित केल्याशिवाय, नियम बनविल्याशिवाय टोळी करून राहणेही त्याला जमू शकत नाही. निसर्गत: आपसूकपणे जगत राहता न येणे हेही अर्थात निसर्गदत्त वैशिष्ट्यच आहे. तात्पर्य असे की, लग्नाची प्रथाही समाजधारणेच्या मार्गातील अडचण निवारण्याच्या प्रयत्नात व त्या उद्देशाने निर्माण केली गेली असली पाहिजे, असे म्हणता येते.

मानवी समाजांच्या बाबतीत सर्व काळात व सर्वत्र आढळणारी एक गोष्ट अशी की आई-मुलगा, बाप-मुलगी, बहीण-भाऊ यांच्यातील लैंगिक संबंध निषिद्ध मानलेले आहेत. असे संबंध हे घोर पाप मानले गेले आहे. नैतिक सहजप्रवृत्तीमधून आपसूकपणे घृणा वाटून असे संबंध टाळले जात नाहीत, तर हा सांस्कृतिक निर्बंध इतका जबरदस्त आहे, की मन तिकडे वळत नाही. सांस्कृतिक स्वरूपाचा निर्बंध असला तरी कुटुंबात जन्मापासून एकत्र वाढणाऱ्या व्यक्तींमध्ये निर्माण होणारे, भावनात्मक व व्यावहारिक संबंध यांचा भक्कम आधार या निर्बंधापाठीशी आहे ही गोष्ट थोड्याशा विचारांती लक्षात येऊ शकते. आई-मुलगा, बाप-मुलगी, भाऊ-बहीण यांच्यात लैंगिक संबंध व प्रजोत्पती या गोष्टी स्वीकारल्यास भावना व व्यवहार या दोन्ही पातळ्यांवर गोंधळ, अराजक माजेल, परस्परसंबंधांमध्ये हेवेदावे व कलह माजेल, व कुटुंब ही रचना टिकूच शकणार नाही.

वानरांच्या टोळ्यांची गोष्ट पाहिली तर एक नर व अनेक माद्या व छोटी पिले यांची एक टोळी तरी आढळते, किंवा कमी-अधिक कालावधीसाठी टिकून राहणाऱ्या एक नर-एक मादी (+पिले) अशा जोड्या तरी आढळतात. पहिल्या प्रकारच्या रचनेत वयात येणारे नर टोळीतून हुसकले जातात. म्हणजे, जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित करण्याची क्षमता जिथे नाही, तसे जिथे घडत नाही तेथेही अनेक नर व अनेक माद्या स्वैरपणे एकत्र नांदणे अडचणीचे ठरते. टोळी टिकून राहावयाची असेल तर या प्रकारच्या स्थितीमधून उत्पन्न होणारा ताण टाळण्याच्या क्लृप्त्या आवश्यक होत. ही गोष्ट जर इतर प्राण्यांच्या बाबतीत खरी असेल तर मानवी टोळीचे समूहजीवन शक्य होण्यासाठी लैंगिक संबंधांची निषिद्ध/स्वीकारार्ह/स्वागतार्ह यांच्यामध्ये एक ना एक व्यवस्था लावणे अनिवार्य असल्याचे भान माणसांना (स्त्री-पुरुष दोघांनाही) मानवेतिहासाच्या अगदी आरंभीच्या टप्प्यावरच झाले असेल असे मानता येते.

मानवी मेंदूचे आकारमान/वजन यांतली वाढ (किंवा डार्विनप्रणीत 'नॅचरल सिलेक्शन'च्या भाषेत बोलावयाचे तर वाढीव मेंदूच्या व्यक्तीनेच अधिक करून

जिवंत राहणे व त्यांची प्रजा वाढत जाणे); मानवी अर्भकाची जन्मत: असलेली कमालीची पंगू अवस्था व पालनपोषणासाठी आवश्यक असणारा दीर्घकाळ; दीर्घकाळ सांभाळ केला गेल्याने (व मेंदूची क्षमताही विशेष असल्याने) बाप, आई, बहीण, भाऊ या संकल्पना रुजणे, त्यामधून भावसंबंधांचे एक विश्व आकारास येणे, यांसारख्या घडामोडी परस्परनिगडीत व अन्योन्याश्रयी राहिल्या असतील. गर्भधारणा व प्रजनन यांमध्ये पुरुषाचे कार्य कोणते याची नेमकी उकल होण्याच्याही आधी, अर्भकांचा सांभाळ करण्यासाठी आवश्यक व उपकारक म्हणून स्त्री-पुरुषांच्या जोड्या अस्तित्वात आल्या असतील, व जिची मुले ती आई व सांभाळ करणारा तो बाप, व एकाच आईची मुले ती भावंडे, व या सर्वांचा मिळून बनणारा समूह हे कुटुंब या संकल्पना जगण्याच्या ओघात आशय व भाव या दोन्ही दृष्टींनी सघन व सखोल बनत गेल्या असतील असा तर्क करता येतो.

ज्यांच्यामध्ये वरील स्वरूपाचे संबंध प्रस्थापित होत त्या घटकव्यक्तींची शब्दाद्वारे ओळख पटविण्याची क्रिया (नामकरण) घडली त्या क्षणी कुटुंब अस्तित्वात आले. एकेका मानवी टोळीमध्ये अगदी आरंभास फार फार तर दोन वा तीन कुटुंबे राहत असतील. कंदमुळे गोळा करून, लहान शिकार करून माणसे जगतात तेथे एकेका टोळीत पंधरा-वीसजणदेखील असतात-नसतात. आजही भटक्या जमातीचे उदाहरण घेतले तरी ही गोष्ट सहजपणे ध्यानात येईल.

संबंध जाणवणे / भावणे आणि जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित करणे या क्षमता, असल्याच तर अगदी क्षीण व प्राथमिक पातळीवर असलेल्या प्राण्यांमध्येही निसर्गत:च लैंगिक संबंध 'यमनियमां'नी बद्ध असतात असे जर माणसाला आढळते, तर मानवजातीचे वंशसातत्य राहण्याच्या 'प्रयत्ना'त कुटुंबरूपी समूह काहीसा आपसूकपणे अस्तित्वात आल्यावर व त्यामधील घटकांमध्ये संबंधांचे एक विश्व / जाळे निर्माण झाल्यावर, काही संबंध निषिद्ध ठरविण्याची आवश्यकता ध्यानात येणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. पण एखादे वर्तन वा एखादा संबंध निषिद्ध ठरवावयाचा तर त्याच वेळी स्वीकारार्ह/स्वागतार्ह वर्तन वा संबंध कोणता याचीही स्पष्टता करावी लागते. टोळीतच दोन-तीन कुटुंबे असत अशी कल्पना केली तर आरंभी कुटुंबाबाहेरचे लैंगिक संबंध हे स्वीकारार्ह इतकेच मानणे पुरेसे असेल.

अर्भकांच्या दीर्घकालीन सांभाळाच्या गरजेमधून कुटुंब अस्तित्वात आले, लैंगिक संबंधांचे काही प्रमाणात नियमन होऊ लागले, तरी ज्याला आपण लग्नप्रथा व संस्था म्हणतो तिची निर्मिती काही-कदाचित बऱ्याच काळानंतरही झाली असण्याचीच शक्यता अधिक. मानवी समाजाच्या धारणेसाठी कुटुंब ही रचना/संस्था अत्यावश्यक आहे. ही रचना अस्तित्वात येण्यासाठी व टिकण्यासाठी कुटुंबातील मध्यवर्ती

सभासद व्यक्तींमध्ये लैंगिक संबंध कठोरपणे निरपवादपणे निषिद्ध ठरविण्याची अनिवार्य शर्त आहे. या अर्थाने मानवी समाजधारणेसाठी ही प्रथा/संस्था अत्यावश्यक नाही.

२

१९२३च्या आसपास इतिहासाचार्य राजवाडे यांनी स्त्री-पुरुष समागमाच्या प्राचीनकालीन प्रथांविषयी त्याच्यात कालौघात होत गेलेल्या स्थित्यंतरांविषयी केलेले लेखन अलीकडे *भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास* या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहे. वेद, महाभारतादी प्राचीन ग्रंथांतील संदर्भाच्या आधारे प्राचीन काळी भारतीय समाजात स्त्री-पुरुषांमध्ये अनियमित स्वरूपाचे लैंगिक संबंध होते असे दाखवून दिले आहे. वेद व महाभारत हे आधुनिक अर्थाने इतिहासग्रंथ व समाजशास्त्रीय अभ्यास म्हणून स्वीकारता येतील का हा प्रश्न उपस्थित होतो. तत्कालीन भारत देशांमध्ये अनेकानेक समाजांचे अस्तित्व होते, आणि त्यांच्याशी आर्य म्हणविणाऱ्या समाजाचा संबंध आला. ज्यांना आपण आर्य म्हणतो तोही एकसंध समाज होता की अनेक टोळी समाजांची ती एक सैलसर रचना होती, असाही प्रश्न आहे. या कारणांमुळे राजवाड्यांचे विवेचन व त्यांनी सुचविलेले निष्कर्ष जसेच्या तसे स्वीकारणे, खरे मानणे योग्य ठरणार नाही.

असे असले तरी मर्यादित स्वरूपाचा निष्कर्ष त्यांच्या विवेचनाच्या आधारे काढता येतो. आई-मुलगा, बाप-मुलगी, भाऊ-बहीण यांच्यात लैंगिक संबंध निषिद्ध ठरविले गेले त्याआधीचा एक प्रदीर्घ कालखंड मानवी समाजांच्या इतिहासात होऊन गेला असला पाहिजे. शक्यता अशी आहे की, आई-मुलगा हा संबंध प्रथम निषिद्ध ठरला असेल. स्त्रीच्या मुलांचा सांभाळ करण्याची काही जबाबदारी उचलणारा पुरुष, आरंभीच्या काळात तिच्या मुलांकडे 'ही माझी मुले' म्हणून पाहत नसेल ही शक्यता अधिक. त्यामुळे ज्या स्त्रीशी टोळीतील इतर पुरुषांसह त्याचेही लैंगिक संबंध राहत असतील तिच्यापासून होणाऱ्या मुली या वयात आल्यावर त्याच्या लेखी ज्यांच्याशी लैंगिक संबंध ठेवायला हरकत नाही अशा स्त्रिया बनत असल्या तर नवल वाटण्याचे कारण नाही. भाऊ-बहीण हे नाते विशेष स्वरूपाचे आहे अशी धारणा उत्पन्न झालेली नसेल तोवर एकाच स्त्रीपासून झालेल्या मुलगे वा मुली यांच्यात संबंध असण्यात काही गैर वाटणार नाही, ही गोष्टही समजण्यासारखी आहे. दुसऱ्या प्रकारे हाच मुद्दा स्पष्ट करावयाचा झाल्यास असे म्हणता येईल की, आई-मुलगा, बाप-मुलगा, बाप-मुलगी, भाऊ-बहीण या सर्व संबंधात्मक संज्ञांची निर्मिती व त्या संबंधांची निर्मिती एकाच क्षणी झाली नसेल; क्रमाक्रमाने ती घडून आली असेल. ज्या समाजात हे सबंध व त्यांना अनुलक्षून असलेल्या संज्ञा स्थिर

झालेल्या होत्या, त्या समाजातील लेखकांनी ज्या अन्य समाजांमध्ये असे संबंध व संज्ञा रुळलेल्या नव्हत्या अशा समाजातील चालीरीतींचे, घटनांचे वर्णन आपल्या परिभाषेत केले, अशी परिस्थिती वेद-महाभारतादी ग्रंथांची असण्याची शक्यता दिसते. राजवाड्यांचे विवेचन गोंधळात टाकणारे आहे याचे हे एक प्रमुख कारण असू शकेल.

राजवाड्यांनी दिलेल्या तपशीलवार पुराव्यामधून जी दुसरी गोष्ट अधिक निर्विवादपणे सिद्ध होते ती अशी की, प्राचीन काळी भरपूर संख्येने प्रजेची उत्पत्ती करण्याच्या हेतूने धार्मिक विधिपूर्वक स्त्री-पुरुष सामूहिकरीत्या व उघड्यावर समागम करणे इष्ट व आवश्यक समजत. ही प्रथा जगभरच्या सर्वच मानव समाजांच्या बाबतीत एका अवस्थेत अस्तित्वात होती असे विधान ठामपणे करणे अवघड आहे. कदाचित, अशक्यही आहे. पण तसे असेल ही शक्यताही स्वीकारली पाहिजे. पण ही प्रथा मानवी समाजाच्या वाटचालीतला कोणता टप्पा दर्शविते, या प्रथेच्या भोवती असणारी व्यापक ऐहिक-सांस्कृतिक चौकट कोणती, याचा खुलासा राजवाड्यांच्या लेखनामधून होत नाही. टोळी समाजातील सभासद-संख्या कायम राखणे/ती वाढविणे यासाठी कसून प्रयत्न करणे आवश्यक असण्याचा हा काळ होता. मरण केव्हा कोणावर झडप घालील याची काहीच शाश्वती नव्हती असाही हा काळ असला पाहिजे. स्त्री-पुरुष समागमाचे कमीत कमी नियमन, प्रजोत्पादनाच्या हेतूनें स्त्री-पुरुष समागमाला कायमचे प्रोत्साहन, किंबहुना स्त्री असो वा पुरुष, समागमाची इच्छा प्रगट केली असता समोरच्या व्यक्तीने त्या इच्छेची पूर्तता करणे हे त्या व्यक्तीचे जणू कर्तव्य, अशी व्यवस्था व धारणा समाजाच्या वंशसातत्याच्या व वृद्धीच्या दृष्टीने उपकारक शाबीत होण्यासारखी एकंदर अवस्था असावी असा तर्क होतो.

स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंधांची व्यवस्था लावण्यामागे, त्यांचे नियमन करण्यामागे समाजाचा मुख्य उद्देश समाजाचे अस्तित्व टिकवून धरण्याचा, समाजाची वंशवृद्धी घडवून आणण्याचा असतो हा मुद्दा ध्यानात घेण्यासारखा आहे. व्यभिचार, पातिव्रत्य, नैतिक वर्तन, पापी वर्तन या शब्दांच्या व्याख्या वरील उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने आश्चर्यकारकरीत्या बदलत गेल्या आहेत.

राजवाड्यांच्या पुस्तकावरून घ्यावयाचा महत्त्वाचा बोध असा की, लग्नाची प्रथा आजच्या अर्थाने अस्तित्वात नव्हती असा एक प्रदीर्घ कालखंड होऊन गेला. या कालखंडात टोळी समाज स्थिर स्वरूपात अस्तित्वात होते, आणि त्यांची वाटचालही चाललेली होती.

लैंगिक संबंधांच्या निषिद्धतेच्या आधारावर कुटुंबाची निर्मिती का झाली, कधी झाली याविषयीच्या विवेचनास आरंभ करण्यापूर्वीच दुर्दैवाने त्यांचे लेखन खंडित

झाले. वेद, महाभारतादी ग्रंथांच्या रचनेचा काळ काही हजार वर्षे इतकाच जुना आहे. हे ग्रंथ ज्या काळात रचले गेले त्याच्या तत्काल आधीपर्यंत व त्या काळातील काही समाजांमध्येही कुटुंबपणाचे, त्यामधील व्यक्तींमधील संबंधांचे विश्लेषण, त्यामुळे या व्यक्तींमधील लैंगिक संबंधांचा धिक्कार या गोष्टी आढळत नव्हत्या, असे मानले तर एक मोठा कूट प्रश्न निर्माण होतो. हत्यारांचा शोध, भाषेचा शोध, कुटुंबरचनेची निर्मिती, टोळीची स्वत:विषयीची आत्मजाणीव व अस्मिता यांचा भाषेच्या द्वारा आविष्कार या गोष्टींचे अस्तित्व एक लाख वर्षांपूर्वीपासून तरी असावे असा पक्का अंदाज अलीकडील अभ्यासकांनी केला आहे. राजवाड्यांनी सादर केलेल्या पुराव्यानुसार काही हजार वर्षांपूर्वीपर्यंत विशेष स्वरूपाच्या कौटुंबिक नातेसंबधांची जाणच उत्पन्न झाली नव्हती, व त्यामुळे काही प्रकारचे लैंगिक संबंध निषिद्ध ठरविण्याचा प्रश्नही समोर आलेला नव्हता.

हा कूट प्रश्न इतक्या सहजी सुटणारा नाही. पण काही तर्क करता येतो. अर्भकांचा सांभाळ करण्याच्या दृष्टीने कुटुंबसदृश रचना अस्तित्वात आल्यानंतरही घराणे, कुल या संकल्पना ताबडतोबीने आकारास आल्या नसणार. या संकल्पनांच्या अस्तित्वासाठी घराणे, कुल यांचा मूळ पुरुष (वा मूळ स्त्री) कोणीतरी मानावा लागतो. ती एक संकल्पना आकारास यावी लागते. वंशवृक्षाची पूर्वीच्या काळापासून अंशत: आठवणीच्या साहाय्याने व अंशत: कपोलकल्पनेने निर्मिती करावी लागते. अशी व्यामिश्र विभागणी होत नाही तोवर टोळीमध्ये कौटुंबिक नातेसंबंध विकास पावू शकत नाहीत. अशा कळपवजा टोळ्यांमध्ये राजवाड्यांनी वेद-महाभारताच्या आधारे चित्रित केले आहेत असे लैंगिक संबंध आढळणे स्वाभाविक आहे.

अग्नीचा शोध लागला, तसे माणसाचे जीवन अधिक सुरक्षित झाले, त्याचा अन्नपुरवठा वाढला, आणि गुहांमध्ये तो निवास करू लागल्याने थंडी, वारा, ऊन, पाऊस, तसेच वन्य श्वापदे यांच्यापासून अर्भकांचे संरक्षण अधिक खात्रीपूर्वक करता येऊ लागले, अशी कल्पना करता येते. अधिक संख्येने मुले जगू लागली, प्रौढ वयापर्यंत त्यांचा सांभाळ नियमितपणे होऊ लागला, तशी कौटुंबिक नातेसंबंधांमध्ये दृढता व खोली प्राप्त होत गेली असेल. लोकसंख्येचा 'विस्फोट' झाला असेल तर टोळीतील कुटुंबसदृश उपसमूहांना स्वतंत्र निवाऱ्याची ठिकाणे व अन्नपुरवठ्याची क्षेत्रे निश्चित करावी लागली असतील. टोळी अशी विस्तीर्ण क्षेत्रावर विखुरली जाऊनही तिची एकात्मता व अस्मिता टिकून राहण्यासाठी अधिक व्यामिश्र स्वरूपाची बांधणी आवश्यक बनली असेल. मुले जगू लागली, त्यांना वाढविण्याच्या कामात स्त्री-पुरुषांची एकमेकांमधील भावनात्मक गुंतवणूक सखोल बनत गेली. एक मूल मोठे होऊन स्वतंत्र होण्याआधी आणखीही मुलांची भर पडू लागली. त्याबरोबर

निवारा, अन्नपुरवठा, स्वसंरक्षण यांचे व्यवस्थापन निर्धोकपणे व कार्यक्षमतेने होण्यासाठी जाणीवपूर्वक निर्णय घेऊन ते राबविण्याचीही आवश्यकता उत्पन्न झाली असली पाहिजे. म्हणजेच, अधिकार व सत्ता, नेतृत्व, प्रमुखपण, या सर्व गोष्टी आल्या. कौटुंबिक समूहातील स्त्री- पुरुषांच्यामधील लैंगिक संबंधाचे नियमन केल्याशिवाय जे संपादन केले आहे ते टिकविता येणार नाही, ही गोष्ट अनुभवानेच तत्कालीन टोळीतील प्रौढ स्त्री-पुरुषांना लक्षात आली असेल.

घराण्याचे, कुलाचे भान तीव्र करण्याचेही काम लैंगिक संबंधांच्या नियमनाने साधले असेल ही गोष्ट जाणता येते. कुलाची वंशवृद्धी होण्यासाठी या नियमनाची अडचण होण्याचेही कारण नव्हते. प्रजोत्पादनासाठी कुलाच्या बाहेर संबंध प्रस्थापित करण्याची गरज व तसे करता येण्याची शक्यता एकाच वेळी अस्तित्वात आल्याने ही अडचण सहजपणे निवारली गेली असेल.

या प्रकारची व्यामिश्र रचना अस्तित्वात आल्यानंतरही टोळीचे पूर्वीच्या काळातले ऐक्य पुन:पुन्हा ठसविण्यासाठी, साजरे करण्यासाठी प्रसंगविशेषी सर्व प्रकारचे नियम व निर्बंध बाजूला ठेवून स्त्री-पुरुषांनी मुक्तपणे समागम करण्याची प्रथा उत्सव, दिंडी यांच्या रूपाने जोपासण्याची रीतही त्याच बदलाच्या नाण्याची दुसरी बाजू म्हणून अस्तित्वात आली असेल. धनधान्यसमृद्धी, समाजाच्या भरभराटीसाठी नियम-निर्बंध यांच्या पलीकडे जाणारी मुक्त स्वरूपाची समागमक्रिया उपकारक, आवश्यक व इष्ट असल्याची धारणा अनेकविध स्वरूपांत मानवी समाजांमध्ये-संस्कृतींमध्ये खोलवर रुजलेली आढळते. व्यामिश्र बनत चाललेल्या समाजाच्या धारणेसाठी आवश्यक नियमन आणि ही धारणा व प्राचीनतम काळचा नैसर्गिक व्यवहार यांच्यात एक निरंतर ताण आहे.

३

लग्न हा मूलत: देवाणघेवाणीचा व्यवहार होता व अद्यापिही बऱ्याच प्रमाणात आहे. हा व्यवहार एकाच समाजातील भिन्न कुलांमध्ये होणारा सामाजिक व्यवहार असे. मुलग्याची व मुलीची देवाणघेवाण कोण कोणाशी करू शकतो, कोणाकोणातील देवाणघेवाण अधिक श्रेयस्कर, कोणाकोणातील निषिद्ध, हे समाजाने ठरवून दिलेले असे. या गोष्टी लग्न करणाऱ्या व्यक्तींवर तर नाहीच, पण ज्या कुटुंबा-कुलातून त्या येत त्या कुटुंब-कुलावरही सोडलेल्या नसत. लग्न करण्याची / लावण्याची योग्य रीत कोणती तेही एकेका समाजात, त्या त्या कालखंडात ठरवून दिलेले असे. समाजाचे वंशसातत्य टिकून राहावे, समाजाची वृद्धी व्हावी यासाठी प्रजोत्पादनाचे कार्य व्यवस्थितरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने लग्नसंस्थेचे सामाजिक नियमन

महत्त्वाचे मानलेले होते. दुसऱ्या बाजूने, लग्नाच्या व्यवहाराद्वारा समाजाच्या उपविभागांचे (घराणी, कुले, जातिजमाती इत्यादी) परस्परसंबंध प्रस्थापितही होत असत व नियमितही होत असत. समाजाची एकात्मता व घट्टपणा नातेसंबंधांच्या विशिष्ट वीणेच्या साहाय्याने साधला जात असे, आणि नातेसंबंध हे लग्नाच्याद्वारा प्रस्थापित होत असत. टोळी समाजाची अवस्था न ओलांडलेल्या सर्व समाजांबद्दल हे निरपवादपणे सत्य आहे. टोळी समाजाची अवस्था ओलांडून संमिश्र, बृहद् समाजाची अवस्था प्राप्त झालेल्या मानवसमूहांच्या बाबतीतही लग्नाद्वारे प्रस्थापित होणाऱ्या नातेसंबंधांच्या विणेतून समाजाचा घाट बऱ्याच अंशी आजही निश्चित होतो, सामाजिक व्यवहाराची उकल होण्यासाठी नातेसंबंधांची वीण ध्यानात घ्यावी लागते. भारतीय समाजाच्या संदर्भात याची सत्यता कोणालाही पडताळता येण्यासारखी आहे.

लग्नसंस्थेच्या संदर्भात इतक्या विविध तऱ्हा जगभरच्या आदिवासी समाजांमध्ये आढळतात की एवढी विविधता कोणत्या कारणाने आली असेल असा प्रश्न पडतो. डार्विनप्रणीत 'नॅचरल सिलेक्शन'चे तत्त्व लागू करून असे आपण म्हणू शकतो की, त्या त्या विशिष्ट पर्यावरणीय व्यवस्थेत यशस्वीपणे उपजीविका हस्तगत करण्याच्या व प्रजोत्पादनाच्या/वंशवृद्धीच्या दृष्टीने अनुरूप अशी प्रथा विकास पावत गेली. हे म्हणणे सोपे व या अर्थाने त्या त्या टोळी समाजांच्या दृष्टीने त्यांनी विकसित केलेल्या विशिष्ट लग्नप्रथेची अनुरूपता दाखवून देणे फारसे कोणाला जमलेले नाही. जमेल असेही दिसत नाही.

कुलाचा वंशवृक्ष चालविणारी मुले (मुलगे किंवा मुली) कोणती याची निश्चिती लग्नप्रथेने केली गेली. जेथे मातृवंशीय समाजरचना अस्तित्वात असेल तेथे खरे तर कुटुंबाचे प्रमुखपण भूषविणाऱ्या स्त्रीची मुले कोण हे सुस्पष्ट असणार. तरीही, मातृवंशीय टोळी समाजामध्येही लग्नाने संततीला औरसपण प्राप्त होते ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. याचा अर्थ असा की लग्नाची प्रथा जेव्हा पाडली जाते तेव्हा ती साऱ्या टोळीच्या पातळीवर अमलात येते, आणि तिचे एक महत्त्वाचे कार्य संततीला समाजमान्यता मिळवून देणे हे असते. येथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. स्त्री-पुरुषांमध्ये लैंगिक संबंध हे केवळ लग्नाच्या नवरा-बायकोमध्येच असावेत, नवऱ्याने उत्पन्न केलेली मुलेच तेवढी औरस, या गोष्टी आग्रहाने व ठामपणे प्रस्थापित करण्यासाठी लग्नप्रथा जन्माला घातली गेली नाही. टोळीच्या अंतर्गत कुलांच्या सीमारेषा आखणे व त्यांच्यात लग्नाद्वारे संबंध प्रस्थापित करण्याची रीत घालून देऊन व्यामिश्र पण एकात्म अशी समाजबांधणी सिद्ध करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते.

स्त्री-पुरुषांमधील समान संबंधाला प्रथमत: या टप्प्यावर बाधा उत्पन्न झाली असे मागे वळून पाहताना लक्षात येते. स्त्री व पुरुष यांच्यात जो लैंगिक कार्यभेद आहे त्याच्याशी या गोष्टीचा संबंध आहे. मुलांना जन्म देणे आणि वाढविणे या कामाची खास जबाबदारी स्त्रियांवरच येऊन पडते, पुरुषाने हातभार लावला तरी अर्भकावस्थेत मातेचे कार्य विशेष महत्त्वाचेच राहणे स्वाभाविक आहे. अग्नीचा शोध लागून उबदार निवाऱ्याची निर्मिती, हिंस्र श्वापदांपासून संरक्षणाची अधिक खात्रीलायक व्यवस्था होण्याअगोदरच्या कळपसदृश टोळीजीवनाच्या अवस्थेत मुलांना जन्म देण्याचे कार्य स्त्री पार पाडीत असली तरी, प्रजनन व संगोपन ही तिची विशेषीकृत कार्य ठरण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती उत्पन्न झालेली नव्हती. संरक्षित, उबदार निवाऱ्याच्या उपलब्धीनंतर मात्र टोळ्यांनी स्त्रियांवर हे काम सोपवून अन्नपुरवठा करण्याचे काम पुरुषाकडे दिले असावे. जगभरच्या सर्वच टोळी समाजांमध्ये ही श्रमविभागणी सारख्याच प्रमाणात, व तेवढ्याच काटेकोरपणे अमलात आली असे आढळत नाही. आजही स्त्री-पुरुष दोघांनीही कंदमुळे गोळा करावीत व भटके जीवन कंठीत मोठ्या कष्टाने जगत राहावे, टोळी समाजाचे अस्तित्व टिकवून धरावे असा प्रकार आढळतो. पण एक गोष्ट लक्षात येण्यासारखी आहे. असे टोळी समाज, लोकसंख्यावृद्धीच्या दृष्टीने अगदी लहानच राहिले आहेत; तसेच टोळीअवस्थेतून बाहेर पडून बृहद् समाजामध्ये त्यांना अवस्थांतर करता आले नाही. येथेच आणखी एका शक्यतेचा ऊहापोह केला पाहिजे. संरक्षित निवाऱ्याच्या जागी स्त्रिया, अर्भके व लहान मुले यांची सुरक्षित व्यवस्था जेव्हा लावता आली तेव्हा समूहाने योजना करून अन्नपुरवठा वाढविण्यासाठी पुरुषांची शक्ती मोकळी झाली. आधीच्या काळात इतर हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण करण्यात त्यांना पुष्कळ अधिक गुंतावे लागत होते. मोठ्या प्राण्याची ठरवून केलेली शिकारीची सुरुवात संरक्षित निवाऱ्याच्या व्यवस्थेच्या पाठोपाठ झाली असण्याची दाट शक्यता आहे. शिकारीच्या प्रयत्नात लांब पल्ल्याच्या आयुधांचा शोधही लागला असेल. मानवी जीवनाने या टप्प्यावर एक मोठे व नवे वळण घेतले. ज्या टोळ्यांनी अशी कार्य व श्रमविभागणी अमलात आणली त्यांची लोकसंख्या वाढली, अन्नपुरवठा वाढला आणि टोळीची पोच अधिक विस्तीर्ण क्षेत्रापर्यंत निर्माण झाली. यापुढची शक्यता अशी की, लांबवर जाऊन शिकार करण्याच्या ओघात अमूक एक प्रदेश आपल्या टोळीचा ही जाणीव उत्पन्न झाली असेल आणि त्याच ओघात, परक्या टोळ्यांशी गाठही पडली असेल.

स्त्रियांनी घरी राहून मुख्यत्वेकरून अर्भकांचा सांभाळ करावा, लहान मुलांचे संगोपन करावे आणि पुरुष मंडळींनी बाहेर जाऊन अन्नपुरवठ्याची व संरक्षणाची

जबाबदारी घ्यावी या विभागणीमुळे घराबाहेरचे जग हे पुरुषांच्या ताब्यात आले, या ज़गातून स्त्रियांची एका अर्थी हकालपट्टी झाली. कळपसदृश टोळीचे अवस्थांतर कुळांमध्ये विभागलेल्या, पण लग्नाच्या प्रथेने परस्परांशी जोडलेल्या, व्यामिश्र स्वरूपाच्या टोळी समाजात होत असतानाच वर उल्लेखिलेल्या इतरही घडामोडी घडल्या. या सर्व घडामोडी एकमेकांना पूरक, बळकटी आणणाऱ्या होत्या ही गोष्ट अगदी उघड आहे.

कळपसदृश टोळीतले जगणे हे निसर्गनियमाने आपसूक घडत राहणाऱ्या प्रक्रियेसारखे अधिक होते. कुलांमध्ये विभागून पण लग्नसंबंधाने जोडून घेऊन एका समाजाची बांधणी करून, अमूक एक भौगोलिक क्षेत्र हे टोळी समाजाच्या प्रभुत्वाचे क्षेत्र आहे ही जाणीव बाळगून व्यवहार करणे, ही मानवी समाज- संघटनेची सुरुवात होती. मानवी संस्कृती व समाजव्यवस्था यांच्या क्षेत्रातील या पहिल्यावहिल्या कृती होत्या.

याच वेळी प्रथमत: पुरुषांनी समाजाचे धुरीणत्व आपल्या हाती घेतले असे दिसते. घराबाहेरच्या जगात अशा सर्व गोष्टींमध्ये निर्णय करण्यासाठी पुरुषच एकत्र येत असल्याने, आणि या गोष्टी पुरुषांनी ठरवाव्यात अशी श्रमविभागणीही झाल्याने, एकंदर समाजाच्या पातळीवर घ्यावयाचे निर्णय पुरुषमंडळींनी घ्यायचे अशी प्रथा पडली. लग्नप्रथेबाबतचा निर्णयही पुरुष समाजधुरिणांचा राहिला असावा असे दिसते.

५

वंश मातेचा की पित्याचा? मातृवंशीय टोळी समाज पूर्वीही होते व अद्यापिही कोठे कोठे आहेत. पण त्यांची संख्या अपवादात्मकच आढळली आहे. सर्व बृहद् व 'प्रगत' समाज तर पितृवंशीयच आहेत.

पितृवंशीय समाज हा पुरुषसत्ताक समाज असे समीकरण सामान्यत: घातले गेले आहे. या आधारे, पितृवंशीय टोळी समाज अस्तित्वात आल्यापासून स्त्रिया दडपल्या गेल्या, पितृसत्ताक म्हणजेच पुरुषसत्ताक समाजव्यवस्था प्रस्थापित झाली, असा युक्तिवाद आजही केला जातो.

पितृवंशीय म्हणजे पितृ व पुरुषसत्ताक तर मातृवंशीय म्हणजे मातृ व स्त्रीसत्ताक असेही समीकरण स्वीकारले, प्रतिपादले गेले. प्राचीनतम काळी प्रथमत: सर्वच टोळी समाजांमध्ये स्त्रियांच्या हाती सत्ता होती (म्हणजेच समाज मातृवंशीय होते) अशी मांडणीही केली गेली आहे.

अलीकडच्या काळात स्त्री-मुक्ती चळवळीतील कार्यकर्त्या / स्त्रियांपैकी तसेच काही मार्क्सवादी स्त्री-मानवसंस्कृतिशास्त्रज्ञांनी या विषयाचा सखोल पाठपुरावा

केला आहे. कळपसदृश टोळीच्या अवस्थेतून टोळी समाजाचे संघटन झाले त्या वेळपासूनच स्त्रीकडे गौणत्व आल्याचे दिसते; मातृवंशीय समाजातही, जरी वंश मातेचा मानला जात असला तरी, सूत्रे भावाच्या/मामाच्या हाती असतात, असे आढळते, या निष्कर्षावर त्यांना यावे लागले. अगदी आरंभापासून स्त्रीकडे गौणत्व येण्याचे काय कारण असावे याची चिकित्सा त्यांनी कसोशीने केली असली तर ती गोष्ट स्वाभाविकच होय. प्रजोत्पादनाच्या संदर्भात स्त्रीलाच पार पाडाव्या लागणाऱ्या कामांमुळे स्त्री अडकून पडते, काहीशी दुबळी ठरते, तिचे चलनवलन मर्यादित होते; तर, पुरुषाकडे रक्षणकर्त्याची, पोषणकर्त्याची भूमिका येऊन त्याची सत्ता वाढते, असे स्पष्टीकरण त्यांपैकी काहींनी दिले आहे.

या स्पष्टीकरणात तथ्य तर नक्कीच आहे पण लग्नप्रथा सुरू झाल्या वेळच्या टोळी समाजाविषयी विचार करीत असताना अधिक सावधानता बाळगावयास हवी. स्त्रीला डांबून घालून तिच्यावर सत्ता गाजवायची ही बुद्धी त्या काळच्या पुरुषांची असेल असे समजणे म्हणजे त्या वेळेची परिस्थिती व तिचे आव्हान याविषयी घोर अज्ञान प्रगट करणे होय. एक प्राणिजाती म्हणून निसर्गसृष्टीत आपली जागा निश्चित व सुस्थिर करून वंशवृद्धी करण्याच्या अत्यंत प्राथमिक अशा कार्यामध्ये सारी ताकद व हुशारी लावण्याखेरीज गत्यंतर नव्हते असा तो काळ होता. आपापल्या पर्यावरणांमध्ये हे आव्हान पेलण्यात माणसे जेव्हा किमान प्रमाणात यशस्वी झाली तेव्हा वासनाविकारांच्या पलीकडे जाऊन परस्परांशी आत्मीयतेचे, प्रेमाचे, काव्यशास्त्रविनोदाचे संबंध निर्माण करण्यास व अनुभविण्यास स्त्री-पुरुषांना अवसर मिळाला. माणसाला माणूसपण परत्र होण्यात, असाहाय्य अर्भकावस्थेपासून संततीच्या दीर्घकाळ कराव्या लागणाऱ्या संगोपनाचा फार मोठा वाटा राहिला असला पाहिजे. कलाकलाने वाढणाऱ्या बाळाच्या लीलांनी घरामध्ये कोणता आनंद निर्माण होतो, ते मूल घरातल्या मोठ्या माणसांना परस्परांच्या जवळ कसे आणते, त्यांच्यात सहृदयता, कोमलता, वात्सल्य कसे जागृत करते याचा अनुभव आजही आपण सभोवतीच्या नवविवाहित तरुण मातापित्यांकडे पाहून घेऊ शकतो. संरक्षित व उबदार निवाऱ्यामुळे आपणावर बंधने आली अशी तत्कालीन स्त्रियांची अनुभूती नसेल. अटळपणे रानोमाळ भटकत असताना पोर जगविण्याची व्यर्थ धडपड करावी लागणाऱ्या स्त्रीचे मन जर जाणता आले तर तत्कालीन स्त्रियांना नवी स्थिती ही केवढी क्रांतिकारक सुधारणा वाटली असेल, मनावरचा जीवघेणा ताण कमी झाल्यामुळे किती उन्मुक्त वाटले असेल याची कल्पना करता येईल. सर्वांच्या अन्नपुरवठ्यातही वाढ झाली, ही गोष्टही लक्षात घ्यायला हवी. टोळीतल्या स्त्रियांना, जीवन अधिक संपन्न, सुसंस्कृत व सुखी करण्यासाठी अनेक गोष्टी करण्यासाठी नव्या व्यवस्थेत कितीतरी अवसर मिळू लागला, ही गोष्टही विसरता

कामा नये. घराला जोडून जी उत्पादक कार्ये (पशुपालन, परसबगीचा, स्वयंपाककला, हस्तकलांच्या नाना वस्तू) ती स्त्रियांनी विकसित केली त्यांचेही श्रेय या नव्या रचनेला व व्यवस्थेला होते असे म्हटले पाहिजे.

समाजसंघटनेची, धोरणविषयक निर्णयांची सूत्रे पुरुषांच्या हाती आली, त्या अर्थी स्त्रियांना गौणत्व प्राप्त झाले असे आपण आपल्या वैचारिक भूमिकेवरून व दरम्यानच्या काळातला इतिहास लक्षात घेऊन म्हणतो. आपण लावतो तो अन्वयार्थ याला कारण पुढील काळातील घडामोडी आहेत हे मात्र जाणले पाहिजे. थोडक्यात, त्या काळात मागे जाऊन पाहिले तर प्राणिजाती म्हणून मानवाची उत्क्रांती व मानवाचा 'आध्यात्मिक' विकास या दोन्ही दृष्टींनी ही नवी समाजरचना एक अभूतपूर्व 'आग छलांग' (ग्रेट लीप) होती. लग्नप्रथा ही या नव्या समाजरचनेला भक्कम आधार देणारी, तिची कार्यवाही सुरळीत करणारी सुधारक कृती होती.

६

भरणपोषणाच्या दृष्टीने स्त्री पार पाडीत असलेली नानाविध उत्पादक कार्ये—आजच्या परिभाषेत आर्थिक कार्ये—महत्त्वाची होती. त्या काळी टोळी समाजापाशी श्रमशक्तीही भरपूर उपलब्ध नव्हती. उलट टंचाईचीच स्थिती सामान्य असावी. यामुळे लग्नामुळे मूल्यवान असा एक श्रमशक्तिसंपन्न सभासद कुलाला गमवावा लागणार, तेव्हा त्याची रास्त भरपाई करण्याची जबाबदारी (पितृवंशीय टोळी समाजात) मुलाच्या कुलाला घ्यावी लागे. मुलीच्या कुटुंबाची भरपाई करण्याची प्रथा आजही आढळते. भारतीय समाजातील कनिष्ठ गणल्या गेलेल्या जातिजमाती या एकेकाळच्या टोळी समाजच होत्या व त्यांच्यात आत्ता आत्तापर्यंत हीच प्रथा चालू होती. तात्पर्य असे निघते की, मुलगी व मुलीचा पक्ष हेच वरचढ असत. जेथे एकाहून अधिक बायका करण्याची चाल आढळते तेथेही स्त्रीची भूमिका लाचारीची, अगतिक दुबळेपणाची असल्याचे ते लक्षण नसते.

आपण वर असे पाहिले की, संततीचे औरसत्व ठरविण्याच्या दृष्टीने लग्नाला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले. यात आणखी एक मुद्दा जोडायला हवा, तो आहे मानप्रतिष्ठेचा. लग्नाने दोन कुलांचा संबंध जुळून येत असल्याने उभय कुलांचा सन्मान राहील असे नवरा व बायको दोघांचेही वागणे झाले पाहिजे, दोन्हीकडच्या कुलांचे वागणे झाले पाहिजे, याला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले असल्यास नवल नाही. नवऱ्याची, नवऱ्याच्या कुळाची तेवढी मान-प्रतिष्ठा राखायची असा भाग नव्हता. म्हणजेच, पुरुष व स्त्री यांच्यात फार मोठी विषमता नव्हती. स्वत:च्या मनाला वाटेल ते करण्यास ना स्त्री मोकळी होती, ना पुरुष. दोघेही आपापल्या

कुळाला, कुळाचाराला व अंतिमत: स्वत:च्या टोळी समाजाला बांधील असत.

लग्नप्रथेबरोबर स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंधांचे नियमन केले जाणे अपरिहार्य होते. पण या बाबतीत मध्ययुगीन काळातील लैंगिक शुद्धतेच्या कल्पनांचा प्रभाव आढळत नाही. किंवा नवऱ्याची मालकीची खाजगी वस्तू म्हणून विशिष्ट निर्बंध स्त्रीवर लादले गेले असेही आढळत नाही. लैंगिक संबंधांच्या क्षेत्रात इतक्या वेगवेगळ्या तऱ्हा जगभरच्या टोळी समाजांमध्ये आढळतात की त्यांची सोपी संगती लावणे अशक्य आहे. लग्न लागते तेव्हा नवऱ्या मुलाला व नवऱ्या मुलीला, तसेच दोन्हीकडच्या कुलांना परस्परांच्या संदर्भात काही हक्क प्राप्त होतात, काही बांधिलकी पत्करावी लागते. हे हक्क व बांधिलकी यांमध्ये काही हक्क व बांधिलकी लैंगिक संबंधांच्या विषयातली असते. त्यांचे पालन न केल्यास दुसऱ्या पक्षाची अप्रतिष्ठा होते. पण लैंगिक संबंध ही अशी गोष्ट आहे की ती पूर्णपणे निर्बंधांच्या साहाय्याने नियमित करता येत नाही. नियमांचा भंग होत राहतो व राहणार; स्त्री व पुरुष दोघांच्याही स्वभावप्रकृतीला औषध नाही, हे शहाणपण टोळी समाजांच्या व्यवहारात ग्रंथित झालेले आढळते. भंग झाल्यास, म्हणजे खरे तर भंग झाल्याचे उघडकीस आल्यास, व्यक्तीची व कुळाची प्रतिष्ठा पुनरपि प्रस्थापित करण्याला महत्त्व दिले जाते. त्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना ठरवून दिलेल्या असतात व शोधून काढल्या जातात. कोणत्या प्रकारचे नियमभंग कोणत्या मर्यादेत खपवून घेतले जातात त्याची कल्पना/माहिती असल्याने स्त्री-पुरुषांना व्यवहारात बरीच मोकळीक असते. आदिवासी टोळी समाजांमध्ये प्रत्यक्ष राहिलेल्या व्यक्तींना या समाजातल्या मुली व प्रौढ विवाहित स्त्रिया या वृत्तीने व वागणुकीने स्वतंत्र व मोकळ्या असतात ही गोष्ट परिचयाची आहे.

या समाजामध्ये स्त्री स्वतंत्र, मोकळी व धीट राहू शकते याची दोन कारणे प्रमुख दिसतात... स्त्री जिथे असेल तिथे, तिच्या उत्पादक कार्यशक्तीमुळे फायद्याचीच असते. आदिवासी टोळी समाजांमध्ये लग्न हा दोन कुळांमधील औपचारिक व्यवहार असला व तो धार्मिक विधीपूर्वक पार पाडला जात असला तरी लग्न मोडणे ही गोष्ट पापसदृश मानली जात नाही. लग्न मोडल्यास त्याही संदर्भातला देवाणघेवाणीचा व्यवहार पुरा करून उभय कुलांची प्रतिष्ठा राखली जावी, व न्याय दिला जावा असा आग्रह असतो.

७

लग्नप्रथा हीच मुळी स्त्रीच्या दास्याला कारणीभूत नसेल तर कोणती वैशिष्ट्ये त्यास कारणीभूत आहेत? कारण स्त्रीचे दास्य आणि प्रचलित लग्नसंस्था यांचा

अन्योन्यसंबंध आज स्पष्ट दिसतो. लग्नसंस्थेमध्ये ही वैशिष्ट्ये कधी व का प्रविष्ट झाली?

टोळी समाज आजही जगात पुष्कळ आहेत. अगदी लहान आहेत तसे मोठे पण आहेत. शेजारच्या टोळी समाजाशी चकमकी होणे, एकमेकांच्या गुराढोरांची, माणसांची पळवापळव होणे, इत्यादी प्रकारही चालत आले आहेत. तरीही टोळी समाज हे त्यांचे स्वरूप बदललेले नाही. काही टोळी समाज हे मात्र एवढ्यावर थांबले नाहीत. त्यांनी आपला प्रदेश सोडून इतर प्रदेशांतील टोळ्यांना जिंकून घेऊन त्यांच्यावर आपले राज्य स्थापन केले. पृथ्वीवरील पर्यावरणात अधूनमधून उत्पातकारी बदल घडून आले आहेत. अशा वेळी आपल्या मूळ प्रदेशात निर्वाह करणे अशक्य झाल्याने टोळ्यांनी वा टोळ्यांमधील धाडसी कंपूंनी स्थलांतर करून आपले नशीब अजमावले आहे. प्रसंगी लोकसंख्येच्या दबावामुळे नवी क्षेत्रे धुंडाळण्यासाठी एकेका टोळी समाजातील जथे बाहेर पडून त्यांनी नवे प्रदेश व लोकसमूह कब्जात आणल्याच्या घटना घडल्या आहेत.

राज्यस्थापनेच्या घटनेने जित व जेते, दोन्ही टोळी समाजांचे आधीचे अस्तित्व संपुष्टात येऊन एका नव्या समाजाची जडणघडण होणे अटळ होते. या नव्या समाजात शस्त्रबळावर राज्य करणारा, एक ना एका प्रकारच्या करभारावर/लुटीवर वैभव भोगणारा राज्यकर्ता वर्ग एकीकडे असतो, तर दुसरीकडे सर्वसामान्य प्रजाजनाच्या पातळीवर जित समाज असतो. जिंकून घेतलेल्या समाजातील अनेकानेक स्त्री-पुरुष हे गुलाम, दास म्हणून राज्यकर्त्या कुलांच्या मालकीचे केले जात असतात. आजचे सर्व बृहद् प्रगल्भ समाज याच मूलभूत प्रक्रियेद्वारा अस्तित्वात आले आहेत. यांना नागर समाज म्हणायला हरकत नाही. कारण शहरांची निर्मिती ही प्राधान्येकरून राज्यकर्त्या कुलांच्या निवासाची, वैभवाची, सत्तेची केंद्रे म्हणून याच स्थित्यंतरानंतर झालेली आढळते.

संरक्षण, शिकार, गुराढोरांचे कळप अंकित ठेवणे, अशा सर्व कामांसाठी शस्त्रांची निर्मिती व त्यांचा वापर ही टोळी समाजांमध्ये पुरुषांची मक्तेदारी प्राचीन काळापासून राहिलेली आहे. साहजिकच स्वाऱ्या, युद्धे यांच्या द्वारा राज्य प्रस्थापित करण्याचे काम पुरुषांच्या टोळ्यांनीच केले. नागर समाजांचे संघटन मुळातच सत्तेच्या जोरावर कुणाला तरी दास बनविण्याच्या, कोणाला तरी लुटण्याच्या, भोगण्याच्या, वंशभेद व श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याच्या भोवती झालेले होते. आणि सामान्यत: आजवर ते तसेच राहिले आहे.

टोळी समाजांमध्येही समाजाचे धुरीणत्व पुरुषांच्या हाती होते. ते समाज पुरुषसत्ताक असलेच तर ती पुरुषसत्ताकता अतिशय जुजबी होती. नव्या नागर

समाजामध्ये पुरुषसत्ताकता ओतप्रोत होती.

राज्यकर्त्या टोळी समाजातील कुलामध्येही आता उच्च-नीच श्रेणी निर्माण होणे अटळ होते. सत्ता, मत्ता व प्रतिष्ठा यांच्यासाठी कुलांमध्ये स्पर्धा उत्पन्न होणे ओघानेच आले. कुलीनतेला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. त्याच वेळी कुलीनतेवर फक्त जेत्या वर्गाचाच हक्क आहे अशी भूमिकाही आग्रहाने घेतली गेली. वंशश्रेष्ठत्वाचा अभिमान आणि वंशशुद्धीचा आग्रह या दोन गोष्टी हातात हात घालून असतात याचा पडताळा हिटलरच्या नाझी जर्मनीत व दक्षिण आफ्रिकेतील गौरवर्णीयांच्या राज्यात आपणास पुरता आलेला आहे. आर्य-अनार्य या भेदावर जोर देणाऱ्या मंडळींच्या युक्तिवादातही याचा पडताळा आपणास नेहमी मिळतो.

माझी संतती औरस म्हणून समाजात मान्यता पावावी हा टोळी समाजात मोठा प्रतिष्ठेचा प्रश्न असतो हे आपण पाहिले. माझे कुल श्रेष्ठ, माझ्या बीजापासूनची शुद्ध संतती मला प्राप्त झाली पाहिजे हा आता प्रतिष्ठेचा प्रश्न बनला. राज्यकर्त्या समाजातही श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद उत्पन्न झाला होता, सत्तेच्या वाटपात या भेदाला महत्त्व होते. लग्नाच्या स्त्रीला एका प्रकारे नजरकैदेत व पिंजऱ्यात ठेवूनच तिला होणारी मुले स्वत:च्या बीजापासून झाल्याची शंभर टक्के खात्री करून घेता येऊ शकते. या स्थितीत पुरुषाने स्वस्त्रीविषयी, व पर्यायाने सर्वच स्त्रियांविषयी, सदैव संशयी बनणे, स्त्री जणू प्रत्येक क्षणी परपुरुषाशी संग करण्यास उत्सुक आहे अशी त्याची धारणा बनणे हे अटळच असते.

कुलांमध्ये संबंध प्रस्थापित करण्यासाठी लग्नप्रथा अस्तित्वात आली. नव्या नागर समाजातील राज्यकर्त्या समाजात अधिक सत्तावान, संपत्तीवान, प्रतिष्ठित कुलाशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी मुलीचा वापर करण्याचा नवाच पीळ लग्नप्रथेला पडला. सत्ता हे संघटनसूत्र असलेल्या समाजातील सत्तास्पर्धेत मुलगी हेही एक सत्तासंपादनाचे साधन बनावे ही गोष्ट विकृत पण अटळ होती. मुलाचा पक्ष वरचढ बनला आणि नवऱ्याच्या कुलासाठी शुद्ध वंशाची संतती उत्पन्न करणे यासाठीच मुलीचा जन्म आहे अशी भूमिका दृढ झाल्याने वयात येण्यापासून तिच्या कौमार्याचे सर्वतोपरी रक्षण करणे हे मातापित्यांचे परम कर्तव्य (व त्यांची कायमची जीवघेणी चिंता) बनले. डोळ्यांत तेल घालून पहारा केला नाही तर मुलगी वाकड्या वाटेने जाणारच अशी संशयी वृत्ती पालकांच्याही मनात घर करून बसली असलेली आढळली तर नवल नाही.

वंशश्रेष्ठत्व, वंशशुद्धी व कुलीनपणा यांना इतके महत्त्व प्राप्त झाले की व्यक्तिगत व सामाजिक नीतिनियमांमध्ये स्त्री-पुरुषांचे लैंगिक संबंध हा भाग अवास्तव महत्त्व पावला. राज्यकर्त्या समाजाचे कुलशील शुद्ध ठेवण्यासाठी स्त्रियांना वयात

येण्यापासून तो प्रजननक्षमता संपुष्टात येईतो कठोर बंधनांमध्ये ठेवणे आवश्यक मानले गेले.

लग्नाच्या नवऱ्याच्या कुळासाठी संतती उत्पन्न करणे यासाठीच स्त्रीचा जन्म, ते तिचे इतिकर्तव्य ही धारणा रुजविली गेली. मुलगी हे 'परक्याचं धन.' लग्न लावून तिला त्या 'परक्या'च्या स्वाधीन केले की आपण सुटलो, धन्य झालो, अशी आई-बापांची भावना. लग्नाच्या वेळी तिचे कौमार्य अभंग असण्याला इतके महत्त्व दिले गेल्यावर, कुलीन घरातल्या मुलीचे लग्न मोडण्यास, पुन्हा लग्न होऊ शकण्यास पूर्ण बंदी घातली जाणे अटळ होते. आपल्या कुलाचा मान राह्यचा असेल तर नवऱ्याला सोडून येणाऱ्या वा नवऱ्याजवळ नांदायला तयार नसलेल्या मुलीचा स्वत:च्या हाताने जीव घ्यायलाही मागे पाहता कामा नये, येथपर्यंत पाळी आली. नवऱ्याच्या घरची मंडळी तर कितीतरी सहजपणे लग्न करून घरात आलेल्या मुलीचा जीव घेऊ शकत. शील राखण्यासाठी असे करणे गैरही मानले जात नसे.

लग्न मोडता येणे, लग्न मोडल्यास सन्मानाने आईवडिलांच्या घरी परत स्वागत होणे, नवे लग्न लावता येणे, लग्नावेळी कुमारिका असणे इष्ट मानले तरी, योनी अक्षत नसेल तर त्याचा बाऊ न करणे, स्त्रीला त्यावरून शीलभ्रष्ट न ठरविणे, विवाहित स्त्रीने परपुरुषाशी संग करणे निषिद्ध जेथे मानलेले असेल तेथेही, नियमाचा भंग झाल्यास, स्त्री-पुरुषांच्या बाबतीत दुटप्पी नीती न अवलंबिता, योग्य भरपाई घेऊन उभयतांना पुनरपि प्रतिष्ठित करून वैवाहिक जीवन सुरळीत करणे यांसारख्या गोष्टींमुळे टोळी समाजांमध्ये स्त्री स्वायत्त राहिली होती. स्वायत्त होती म्हणजे ती स्वैर वर्तन करायला मोकळी होती, किंवा सरसकट स्वैर वर्तन करीत होती, असे मुळीच नाही. लैंगिक संबंधांबद्दलच बोलायचे तर, नियमाचे उल्लंघन करण्यास प्रोत्साहन मुळीच नसे, पण उल्लंघनाच्या वर्तणुकीकडे समंजसपणे पाहिले जाई. स्खलन स्वाभाविक आहे असे म्हणण्याइतकी कामेच्छा ही प्रमाथी वासना आहे ही गोष्ट स्वीकृत होती.

या सर्व गोष्टींच्या अभावी, नव्या समाजातील कुलीन स्तरांमधील, व कुलीन स्तरांमध्ये प्रविष्ट होण्याची आकांक्षा बाळगण्याच्या कनिष्ठ स्तरांमध्ये, लग्नसंस्थेमुळे स्त्रीला दास्यत्व प्राप्त झाले.

९

असे आहे तर कोणी तरी 'कुंकवाचा धनी' असावा अशी सर्वसाधारणपणे सर्वच स्त्रियांची इच्छा का असते? लग्न, नवरा यांत त्यांना सुरक्षितता का वाटते?

तसेच, लग्नामुळे वास्तविक स्त्री बंधनांमध्ये अडकत असूनही लग्न ही

पुरुषाच्या पायातली बेडी असे जगभर का म्हटले जाते? पुरुषाच्या पायात बेडी पडते म्हणजे काय होते? लग्न व्हायच्या आधी तो कशासाठी मोकळा असतो? त्याच्या पराक्रमी पौरुषाला लग्नामुळे पायबंद बसतो याचा अर्थ असा की, धर्मपत्नीचे 'देणे' देण्याचे बंधन येऊन पडल्यामुळे त्याला यापुढे आपले पौरुष गाजवीत अनिर्बंधपणे उंडारता येणार नाही.

युद्धामध्ये जय मिळाल्यानंतर जित लोकांची चीजवस्तू लुटण्यातलाच एक भाग जित लोकांच्या स्त्रियांना स्वैरपणे उपभोगणे हा असतो, हे आपणास माहीत आहे. विजय साजरा करणे, पौरुष गाजविणे, सत्तेचा आविष्कार करणे असे या प्रकाराचे स्वरूप असते. परस्परांविषयीच्या आकर्षणातून परस्परांच्या संमतीने घडणारा समागम हा क्रीडनाचा आनंददायी प्रकार असतो. जेव्हा स्त्रीसुख ओरबाडून घेतले जाते तेव्हा त्यात पुरुषाचा अहंकारच पोसला जातो.

या नव्या नागर समाजात जेत्या पुरुषवर्गाकडून प्रसृत केली जाणारी स्त्रीविषयक भूमिका व नीती हा पुरुषसत्ताक अहंतेचाच आविष्कार असतो. स्त्री ही सावज म्हणूनच बघितली जात असते. शस्त्रबळावर उभारलेल्या या समाजात, कोणाचे ना कोणाचे संरक्षण नसलेली स्त्रीही आपण 'अबला' आहोत, कधीही आपली शिकार होण्याचा धोका आहे असे अनुभवीत, गृहीत धरीत असली पाहिजे. ही तिची भीती कपोलकल्पित असते असे मानण्याचे कारण नाही.

पुरुष सदैव स्त्रीचे सुख लुटायला टपलेला असतो. स्त्री ही स्वभावाने कामिनी, मोहिनी, उच्छृंखलच असते पण, काहीही करून तिने तिची कामवासना दडपून टाकून, नवऱ्यासाठी मुले उत्पन्न करण्यासाठी आपले शील जपणे तिचे परमकर्तव्य आहे; लग्न होऊ शकले नाही वा कुमारी राहण्याची इच्छा तिने प्रकट केली वा लग्न मोडले तर समाजात तिची व तिच्या कुलाची अब्रू जाईल, यासारखे संस्कार लहानपणापासून घेऊन जगणारी, वयात येऊ लागल्यापासून हे वातावरण अनुभवणारी, या संस्कारांनी व वातावरणाने दडपून गेलेली स्त्री लग्नाची बेडी पुरुषाच्या पायात अडकवून 'कुंकवाचा धनी' मिळवायला उत्सुक असली तर नवल नाही. लग्न होऊन दोन मुले झाली, त्यातही एक तरी मुलगा झाला, की ती निर्धास्त होते. तिच्या मनावरील ताण दूर होतो, ती स्थिरावते. त्यातच जर तिच्या सुदैवाने नवरा तिच्याशी समजुतीने वागत असला. व्यसनी, बाहेरख्याली, मारझोड करणारा नसला, सासरच्या इतर मंडळींचा जाच नसला, फार कष्ट उपसावे लागत नसले; तर ती स्वत:ला धन्य समजते. स्वर्ग तिला दोन बोटे उरतो. वस्तुस्थिती अशी आहे या गोष्टीचा आजही कोणाला पण पडताळा घेता येईल. नोकरदार, व्यावसायिक, धंदेवाईक मध्यम व उच्चवर्गीय कुटुंबातल्या तरुण व मध्यमवयीन अशिक्षित वा

उच्चशिक्षित स्त्रियांचे बोलणे-चालणे ऐकावे, पाहावे. तुम्ही दास्यात आहात, लग्नामुळे स्त्री फार बंधनात पडते, असे कोणी त्यांना सांगू लागले तर त्यांना ते म्हणणे हास्यास्पद व वेडगळ तरी वाटेल, किंवा अतिशय धोकादायक वाटेल. यांपैकी बहुतेकींचे नवरे पुरुषसत्ताक समाजातही खऱ्या अर्थाने सत्ताविहीन असल्याने, दास्यात व बंधनात कोणी असले तर नवरेच त्यांच्या 'दास्यात' आहेत ही वस्तुस्थिती त्यांना मनोमन माहीत असते. नवरा-बायको व दोन-तीन मुले असा आटोपशीर संसार असणारी, बऱ्यापैकी उत्पन्न असणारी अशी असंख्य घरे आज सर्वत्र पहावयास मिळतील.

हा एक ठळक विरोधाभास आहे, त्याला बगल देता येत नाही, देऊन चालणार नाही. मग प्रश्न असा की, सत्य काय आहे?

दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. स्वतंत्र वृत्तीने आपल्या मनाप्रमाणे एखादा पेशा पत्करून जगायचे, मित्रमैत्रिणींच्या गोतावळ्याचे आपले स्वत:चे एक (नवऱ्यापेक्षा) स्वतंत्र असे विश्व निर्माण करायचे, असे जेव्हा विवाहित स्त्री ठरविते तेव्हा, शंभरातल्या नव्याण्णव वेळा, तिला आपण सोनेरी अस़ला तरी, पिंजऱ्यात आहोत हे लक्षात़ यायला फार वेळ लागत नाही वा फार दूर जावे लागत नाही. पण असे काही तिच्या मनात येणे हीच गोष्ट इतकी दुर्मीळ आहे! तसे तिच्या मनात आले नाही, येऊन टिकले नाही तर पिंजऱ्याचे गज तिला दिसणारच नाहीत, बोचणार नाहीत. अपवाद म्हणायचा तर, काही कारणाने नवऱ्याच्या घरात तिचा छळ, दु:स्वास, होत असला तर.

दुसऱ्या बाजूला, वर्तमान पुरुषसत्ताक समाजाच्या स्त्रीविषयक दृष्टी, भूमिका व वर्तणूक ध्यानात घेता लग्नसंबंधच तिला संरक्षण देतो, तिला स्वत:चे हक्काचे घर प्राप्त करून देतो. (कालांतराने का होईना) तिच्या हाती आई म्हणून, सासू म्हणून, थोरली वहिनी म्हणून, काकू म्हणून सत्ता व मान मिळवून देतो, या गोष्टींचे सत्यत्व कसे नाकारता येईल? स्त्री ज्या घरात जन्माला येते व लहानाची मोठी होते त्या घरात एका विशिष्ट वयानंतर ती जर कुमारिकाच राहिली वा विधवा म्हणून माहेरी परत आली, तर बहुतांश घरांमध्ये तिला अद्यापही असुरक्षित व अप्रतिष्ठित जिणे जगावे लागते. घरासाठी लग्न लांबणीवर टाकून, कमाई करून घर चालविणारी स्त्री असेल तरी यात फरक पडेलच याची खात्री नसते.

१०

भूतकाळातल्या समाजाबद्दल लिहिता लिहिता आजच्या समाजस्थितीचा हवाला वर दिला आहे हे अनवधानाने घडलेले नाही. तीन-साडेतीन हजार वर्षांपूर्वी

अस्तित्वात असलेल्या नागर समाजाच्या अवस्थेतच आपण अद्यापही आहोत. गेल्या तीन-साडेतीन हजार वर्षांमध्ये महत्त्वाचे कोणतेच टप्पे नाहीत असा वरील म्हणण्याचा अर्थ नाही. सामंतशाही व भांडवलशाही हे दोन मोठे टप्पे तर उघडच आहेत पण या प्रदीर्घकाळात एक सलगता आहे. विशेषत: लग्नसंस्थेच्या संदर्भात ज्या प्रकारच्या पुरुषसत्ताकतेने लग्नसंस्थेचे स्वरूप मूलत: पालटवून टाकले ती पुरुषसत्ताकताच आजच्या समाजव्यवस्थेची व संस्कृतीची बैठक आहे.

शस्त्रबळाची जागा अर्थबळाने घेतली आहे असे भासते. पण हे सर्वस्वी खरे नाही. शस्त्रबळाचे रूपांतर पूर्वी अर्थबळात केले जात होते, व दोन्ही प्रकारच्या बळाचा वापर मग राज्य करण्यासाठी, सत्ता गाजविण्यासाठी केला जात होता. आज अर्थबळाच्या जोरावर शस्त्रबळ (म्हणजे शासनसत्तेवरील प्रभुत्व) संपादन केले जाते आणि मग दोहोंचा मिळून वापर केला जातो.

लग्नसंस्थेसंबंधी विवेचन करीत असताना एंगल्स यांच्या सुविख्यात *द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी, अँड स्टेट* ग्रंथातील विवेचनाची दखल घ्यावीच लागते. त्यांच्या विवेचनातल्या त्रुटी अनेक अभ्यासकांनी, मार्क्सवादी अभ्यासकांनीही स्पष्ट केल्या आहेत. एंगल्स यांच्या विवेचनाची तपशीलवार, सखोल चिकित्सा करण्याचे हे स्थळ नाही. पण त्यांच्या विवेचनातील त्रुटींपेक्षा कुटुंब, खाजगी मालमत्ता, राज्यसंस्था यांसारख्या सामाजिक संस्थांच्या उदय-उत्कर्षाशी स्त्री-पुरुष-संबंधाचा, स्त्रीच्या स्थितीचा घाट निगडीत असतो ही त्यांची मार्मिक दृष्टी अतिशय मोलाची आहे. उपजीविका हस्तगत करण्याची साधने-तंत्रे व पद्धती आणि त्या ओघात प्रस्थापित होणारे संबंध या अर्थाने 'अर्थव्यवस्था' हा शब्द घेतला तर, अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरामुळे इतर सर्व गोष्टी बदलतात ही मार्क्स-एंगल्स यांची भूमिका राहिली. अर्थव्यवस्थेचे हे पायाभूत महत्त्व न नाकारता असे म्हणता येईल की इतरही प्रकारच्या काही घडामोडींमध्ये—प्रचंड मोठे नैसर्गिक उत्पात, दुष्काळ, रोगांच्या साथी, पृथ्वीच्या पर्यावरणातील बदल (हिमयुगांचे येणे व जाणे), परचक्रे, प्रमाथी नेतृत्व, सामाजधुरिणांचे निर्णय इ.—असे सामर्थ्य असते.

राज्यसंस्था अस्तित्वात आल्याने स्वत: कष्ट करून उत्पादनखर्चात सहभागी न होता, राज्यकर्ता/जेता/रक्षणकर्ता या स्वत:च लादलेल्या नात्याच्या जोरावर एकूण उत्पादनापैकी मोठा भाग वेगवेगळ्या मार्गांनी स्वत:च्या उपभोगासाठी काढून घेणारा एक वर्ग अस्तित्वात आला. या 'क्षात्र' वर्गाच्या जोडीला/दिमतीला पुरोहित वर्ग, प्रशासक, सैनिक व कर्मचारी वर्गही अस्तित्वात आला. 'अर्थव्यवस्थे'चा घाट तसाच राहूनही पुष्कळ गोष्टी बदलल्या. अनुत्पादक वर्गामधील स्त्रियांनी घराबाहेर पडून उत्पादक कामे करणे कमीपणाचे, कुलीनतेला न शोभणारे, जित व खालच्या

('शूद्र') लोकांशी संपर्क येईल म्हणून धोक्याचे ठरले असले पाहिजे. कालपरवापर्यंत काबाडकष्ट करून जगणाऱ्या जातिजमातींमधील पुरुषमंडळी नोकऱ्याचाकऱ्या करून पांढरपेशी बनली की आपल्या स्त्रियांनी काबाडकष्टाची उत्पादक कामे करण्याचे सोडून द्यावे असा त्यांचा आग्रह असतो ही गोष्ट आपण पाहतो.

सत्ताधारी व सत्तेच्या आश्रयाने राहणारा अनुत्पादक वर्ग याचे सांस्कृतिक प्रभुत्व बाकीच्या समाजावर असते. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला जातो. त्यांच्या मानदंडाने कनिष्ठ वर्ग आपणाला मोजीत असतात. स्त्री-पुरुष संबंधविषयक नीतिनियम, स्त्रीविषयीची दृष्टी व धारणा, स्त्रीशी होणारा व्यवहार, स्त्रीचे गृहजीवन, स्त्रीच्या जीवनाचे श्रेयस, लग्नसंस्था, इत्यादींच्या संदर्भात या वरिष्ठ, अनुत्पादक 'कुलीन' वर्गांनी जे पायंडे निर्माण केले व जी आयडियालॉजी रुजविली त्यांनी स्त्रीच्या स्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणला.

पुरुषसत्ताक नागर समाजात वरील प्रकारचा अनुत्पादक वरिष्ठ वर्ग अर्थातच अल्पसंख्य होता. भारताच्या संदर्भात आपण स्थूलमानाने असे म्हणू शकू की त्रैवर्णिकापुरता तो मर्यादित होता. बहुजनसमाज, जो पुढे शूद्र व पंचम म्हणून ओळखला गेला, हा उत्पादक कार्यात व सेवाचाकरीत गुंतलेला राहिला. या वर्गातील स्त्रिया उत्पादक काबाडकष्ट करीत होत्याच. बहुजनसमाजात दाखल झालेलेही तत्पूर्वी टोळी समाजांमध्ये राहात होते. ज्या प्रमाणात ते नव्या नागर समाजात दास म्हणून, शूद्र म्हणून, पंचम म्हणून सामावून घेतले गेले त्या प्रमाणात त्यांची स्वायत्तता व एकसंधपणा नष्ट झाला. जेत्या कुलांमध्ये एक प्रकारे त्यांची विभागणी, वाटणी होऊन गेली. त्यांच्या स्त्रियांची विशेषच अवनती झाली कारण जेत्या/वरिष्ठ वर्गातील पुरुषांना त्यांना भोगण्याचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त झाल्यासारखीच परिस्थिती होती. त्या स्वत:च्या जातिजमातीत कोणाच्या ना कोणाच्या लग्नाच्या बायका असत. त्याच वेळी भोगदासीही असत. त्यांचे नवरे हे स्वत: दडपलेले होते. पण नव्या समाजाची पुरुषसत्ताकता त्यांनीही आपल्या परीने उचलली. या वर्गातल्या स्त्रियांची दुहेरी वाताहत झाली.

दुसऱ्या टोकाला समाजातल्या अगदी वरच्या थरात—राजघराणी, उमराव मंडळी, धनिक वर्ग—भोगविलासी जीवनाला बहर आला. लढाई चालत नसेल तेव्हा रोज उठून करावयाची कामे नाममात्रच असत. साधनसंपत्तीचा ओघ अखंड वाहत असलेला व रिकामा वेळ कसा घालवावा हा मोठाच प्रश्न. काही सन्माननीय अपवाद सोडता, इतरांचा वेळ मौजमजा करण्यातच जात असला तर काय नवल? स्त्रियांचा मन मानेल तसा स्वैर उपभोग, त्याच्या नाना तऱ्हा, हा भोगविलासी जीवनाचा एक मोठा भाग तेव्हापासून आजपर्यंत राहिलेला आढळतो. या भोगविलासात

स्वत:च्या लग्नाच्या बायकांना सहभागी करून घेणेही अटळपणे एका अवस्थेत घडते, असेही इतिहासात वारंवार आढळून आले आहे. वरकरणी आदिम टोळी जीवनातील स्त्री-पुरुषांच्या व उघड्यावरील उन्मुक्त समागमाच्या प्रसंगासारखीच ही रीत असल्याचे भासते. त्या काळची सहज नैसर्गिकता, व टोळीच्या ऐक्याशी, भरभराटीशी, त्या साऱ्या प्रथेची धार्मिक विधिपूर्वक घातलेली सांगड, त्यामुळे त्याला येणारे वेगळेच गांभीर्य व वजन यांचा या जेत्या वरिष्ठांच्या भोगविलासाच्या नाना तऱ्हांमध्ये स्त्रियांचा सहभाग असला, त्यात त्या रमत असल्या, तरी तोही पुरुषसत्ताकत्तेचाच आविष्कार असतो हेही ध्यानात घेतले पाहिजे.

तात्पर्य असे की, एंगल्स यांची दृष्टी मार्मिक असली तरी त्यांचे विश्लेषण एकांगी, अपुरे व असमाधानकारक राहते.

११

लग्नसंस्थेला भांडवलशाहीमध्ये मिळालेला वळसा कोणता हे पाहण्याआधी एक मुद्दा मांडला पाहिजे. नागर समाजाच्या निर्मितीपासून पुरुषसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आली आणि लग्नसंस्थेला एक विशिष्ट चौकट प्राप्त झाली. ही चौकट स्त्रीला अनेक प्रकारे बंधनांमध्ये टाकणारी होती. अशा बंधनांमध्ये की जी पुरुषांवर नव्हती. 'स्त्रीचे दास्य' असे आपण अर्थपूर्णरीत्या त्या काळातल्या व्यवस्थेच्या व लग्नसंस्थेच्या चौकटीच्या आधारे म्हणू शकतो.

पण कोणत्याही काळातल्या हाडामांसाच्या स्त्री-पुरुषांच्या बाबतीत 'व्यक्ती तितक्या प्रकृती' ही म्हण खरी असते. पुरुषसत्ताक समाजातही दुबळे पुरुष पुष्कळ असतात आणि समर्थ स्त्रियाही पुष्कळ असतात. कित्येकदा स्त्रिया इतक्या समर्थ व्यक्तिमत्त्वाच्या असतात की धट्ट्याकट्ट्या पुरुषांबरोबर एक पाय बांधून शर्यतीत उतरावे लागूनही त्या राज्ये करून अमर होतात. झुकते माप पुरुषाच्या पदरात जन्मत:च टाकणारी ही व्यवस्था असली तरी, सत्तेचा खेळ खेळण्याचे कसब स्त्रियाही आत्मसात करू शकतात, करतात व पुरुषांवर डाव उलटवितात. कारण व्यवस्था कोणतीही असली तरी पुरुषांप्रमाणेच स्त्रीही षड्विकारयुक्त आहे, आकांक्षी आहे. ईप्सित गाठण्यासाठी जिद्दीने व हुशारीने, धडपडणारी आहे; मनाने मोठी वा कोती आहे, इत्यादी. शर्यतीस आरंभ करण्यापूर्वीच तिला लंगडी करून ठेवलेली असल्याने या पुरुषसत्ताक जगात सत्तेचा खेळ खेळण्याची तिची रणनीती व डावपेच पुरुषांपेक्षा वेगळे असणे स्वाभाविक आहे, काही क्षेत्रांत स्त्रीला सामान्यत: प्रवेश बंद असल्याने सत्ता गाजविण्याची तिची क्षेत्रे वेगळी राहिली आहेत. पुरुषांवर सत्ता गाजविण्याचा मुद्दा असेल तेथे 'पडद्याआडून' पुरुषाला मुठीत ठेवण्याची हिम्मत

स्त्रियांनी नाना प्रकारे प्रगट केली आहे. पुरुषसत्ताक समाजातल्या कर्तृत्ववान, सत्ताधारी व महत्त्वाकांक्षी पुरुषांच्या ठिकाणी जोपासल्या जाणाऱ्या स्त्रीलालसेचाच चतुर स्त्रियांनी पुरुषांवर मात करण्यासाठी उपयोग केला आहे. किंबहुना नवऱ्यांना वेसण घालून लगाम आपल्या हाती ठेवण्यासाठी, आपल्या तालावर नाचविण्यासाठी बायकांनी पुरुषांच्या कामच्छेचाच त्यांच्यावर गळफासासारखा उलटा प्रयोग करण्याची प्रदीर्घ परंपरा आहे. तिची यशस्विता अनुभवसिद्ध असल्यानेच मौखिक परंपरेने ही शिकवणूक नववधूंना दिली जात असते.

पण यापलीकडे जाणारी, अधिक हृद्य व मंगल अशीही एक गोष्ट आहे. एका अतिशय मूलभूत अर्थाने स्त्री व पुरुष हे एका उच्चतर पूर्णाचे अर्ध होत. प्रजोत्पादनासाठी त्यांचे शारीर मिलन व्हावे लागते या मर्यादित अर्थाने तर हे खरे आहेच. पण जीवनाला उमेदीने सामोरे जाण्यासाठी स्त्री-पुरुषांना परस्परांपासून मिळणाऱ्या अनेकविध स्वरूपाच्या पोषणाची, आधाराची गरज असते. प्रजोत्पादनासाठी आवश्यक शारीर मिलनाप्रमाणेच या भरणपोषणासाठी, आधारासाठी वेगवेगळ्या कारणांनी—मुलांचे संगोपन, जेवणखाण, घरातला वावर इतकेच नव्हे तर रुसवे, फुगवे, भांडणे, तसेच हास्यविनोद—परस्परांच्या सहवासांची गरज असते. लग्नसंस्थेने निर्माण केलेली चौकट ही विषम, अन्याय्य व जाचक असली तरी, ती नवरा व बायको यांना घराच्या चार भिंतींच्या आड अनेकविध अंगांनी व पातळ्यांवर अटळपणे एकत्र आणत राहते. त्यामुळे असाधारण व विकृत अशी प्रकरणे सोडली तर बहुसंख्य सर्वसामान्य जोडपी परस्परांच्या सततच्या सहजीवनातून एकमेकांशी समीकरण साधत असतात. वैवाहिक जीवन जर पुरेसा दीर्घकाळ टिकले तर परस्परांमध्ये समंजस आत्मीय संबंध निर्माण होतो. स्त्रीपुरुष समानता ही अशाही संबंधांची बैठक असत नाही, ही गोष्ट उघडच आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेतील लग्नाच्या चौकटीत ती जवळपास अशक्यप्राय अशी गोष्ट राहते. पण स्त्रीला तिचे एक मानाचे, सत्तेचे, आदराचे स्थान प्राप्त झालेले, नवऱ्याकडून तिची प्रामाणिक कदर केली जात असल्याचे, नवऱ्याला तिचा धाक असल्याचे आढळून येते.

नागर समाजाच्या स्थापनेपासून आजवरच्या प्रदीर्घ काळातल्या कोणत्याही कालखंडात कोणत्याही चालत्या-बोलत्या समाजात आपण जाऊ शकलो असतो तर आपणास सरसकट सगळ्या स्त्रिया भरडल्या जात आहेत, त्यांची विटंबना चालली आहे असे चित्र दिसले नसते. जवळपास प्रत्येक जोडप्याने साधलेले आपापसातले समीकरण अजोड असल्याने वास्तवातले चित्र नेहमीच कमालीचे गुंतागुंतीचे राहत आले आहे.

कुटुंब व लग्नसंस्था यांचे पूर्वीच्या काळातल्या स्थितीचे अलीकडे परिश्रमपूर्वक

अभ्यास केले गेले आहेत त्यामधून वेगळीच, अनपेक्षित तथ्ये समोर आली आहेत. सर्वसाधारणपणे वैवाहिक जीवनाचा कालखंड फार थोडा असे. अगदी अलीकडेपर्यंत सरासरी आयुर्मान जगभरच ३५-४० च्या आसपासच होते. दुष्काळ, रोगराई, अपघात, लढाया अशा नाना कारणांनी माणसे लहान वयात मृत्यू पावण्याचे प्रमाण मोठे होते. परवा परवापर्यंत आपल्या देशात बालविधवांचे प्रमाण लक्षणीय होते. बाळंतपणात मृत्यू पावणाऱ्या स्त्रियांची संख्या बरीच होती.

जोडीला आणखीही एक गोष्ट होती. नवरा-बायको-मुले असे द्विध्रुवी त्रिकोणी कुटुंब आपले आपण वेगळेच राहत आहे असे क्वचितच आढळत असे. विशाल परिवारात वा गोतावळ्यात-समुदायात माणसे राहत. लग्न होऊन नवऱ्याच्या कुळात / गोतावळ्यात येणारी स्त्री ही नव्या घरात आपल्याहून लहान-मोठ्या असणाऱ्या अनेक स्त्रियांच्यात येऊन पडे. नववधू ते ज्येष्ठ सासू येथपर्यंत तिच्या वाटचालीचे अनेक टप्पे असत. तिच्या दडपणुकीत घरातील इतर स्त्रियांची भूमिका असे, आणि आपल्या परीने तिला संरक्षण व आधार देणाऱ्यांत तिचा नवरा व इतरही कोणी पुरुष (धाकटा दीर, माहेरची पुरुष माणसे, इत्यादी) असत.

गेल्या तीन-साडेतीन हजार वर्षांतल्या स्त्रीच्या स्थितीचे चित्रण अखंडपणे गडद काळ्या रंगात आपण केले तर ती गोष्ट वस्तुस्थितीला सोडून होईल.

१२

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे क्रमश: साऱ्या युरोपात व उत्तर अमेरिकेत, व नंतर जगभर पुरुषसत्ताक नागर समाजरचनेच्या व्यापक अधिष्ठानावरच पण पुष्कळशी नवीन समाजव्यवस्था अस्तित्वात आली. तिला आपण भांडवलशाही या नावाने ओळखतो. भारतात ब्रिटिश भांडवलशाहीचे वसाहतवादी प्रभुत्व दीर्घकाळ होते. स्वातंत्र्योत्तर काळात आपण राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असलो तरी आर्थिक व सामाजिक-सांस्कृतिक, दोन्ही दृष्टींनी जागतिक भांडवलशाहीच्या प्रभुत्वक्षेत्रात अधिकच पुरतेपणी आलो आहोत. कोणी भाग पाडले म्हणून नव्हे, तर स्वेच्छेने.

ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित होण्यापूर्वीच्या जातिधिष्ठित भारतीय समाजात कुलवर्णीयांमध्ये लग्नसंस्थेचे जे स्वरूप होते ते आज उच्चशिक्षित, शहरी पांढरपेशा वर्गामध्ये पुष्कळ बदलेले आहे. भांडवलशाहीच्या ऐन उत्कर्षाच्या काळात, राणी व्हिक्टोरियाच्या जमान्यातील नमुन्याचा व आयडियॉलॉजीचा प्रभाव येथील शिक्षित, पांढरपेशा सुधारकांवर पडला. वैचारिक-सांस्कृतिक दृष्ट्या विचार केला तर आजच्या सुशिक्षित उच्च मध्यमवर्गीय समाजामध्ये लग्नसंस्थेचे व त्या अनुषंगाने येणाऱ्या कुटुंबसंस्थेचे तेच व्हिक्टोरियन मॉडेल प्रभावी आहे असे म्हणता येईल. पाश्चात्त्य

समाजातील अद्ययावत प्रवाहांशी सतत संपर्क असलेल्या उच्चभ्रू घरामध्ये लग्नाची रीत व कुटुंबसंस्थेची ठेवण बदललेली नसली तरी घराबाहेर पुरुषांच्यामध्ये सामाजिक-सांस्कृतिक जीवनात वावरण्याची मोकळीक या थरातील स्त्रियांना मिळाली आहे. भारतीय समाजात कनिष्ठ मध्यमवर्गीय ब्राह्मण समाजामध्ये, वैश्य समाजामध्ये, शूद्र स्थानांवरून क्षत्रिय स्थानापर्यंत वर पोचलेल्या बहुजन समाजामध्ये सुधारकी प्रवाह वाढलेले असले तरी कुलपरंपरांचे, कुलीनतेच्या पारंपरिक कल्पनांचे व लग्नसंस्थेच्या पारंपरिक रीतींचे महत्त्व फारसे कमी झालेले नाही. या कारणाने आपल्या समाजाचा विचार केल्यास जुन्या उच्चवर्णीय नमुन्यावर व्हिक्टोरियन नमुन्याचे कलम करून तयार होणारे लग्नसंस्थेचे स्वरूप हे सांस्कृतिक दृष्ट्या प्रभावी आहे असे म्हणता येईल.

इंग्लंड व युरोप-अमेरिकेत भांडवलशाही व्यवस्था प्रस्थापित करणारा वर्ग बूर्झ्वा या नावाने ओळखला जातो. आपल्याकडील कनिष्ठ दर्जाच्या व्यापारी, कारागीर व शूद्र वर्गाशी याची तुलना होते. हा वर्ग अगदी मोलमजुरीवर जगणारा तळागाळातला वर्गही जरी नसला तरी यातील कित्येक जणांची कुटुंबे नजीकच्या भूतकाळात या थरातून आलेली होती, वा त्यांनी स्वत:ही आपल्या पूर्वायुष्यात ते जीवन अनुभवलेले होते. उच्च खानदानी वर्गांपासून ते अधिकच दूर होते. त्यांना प्राप्त झालेली आर्थिक सुस्थिती ही स्वकष्टार्जित होती, त्यासाठी त्यांनी कल्पकता, उद्योजकता, कठोर शिस्त, काटकसर, इत्यादी गुण जोपासले होते. ज्या सामंतशाहीच्या विरोधात, किंवा पोटात राहून ते नवी शेतकी व औद्योगिक क्रांती घडवून आणीत होते त्या सामंतशाही व्यवस्थेविषयी त्यांच्या मनात घृणा होती. या व्यवस्थेत तळागाळाच्या कष्टकरी जनसामान्यांचे जीवन केवळ पशुवत् बनल्याचे त्यांना दिसत होते. दुसऱ्या टोकाला वरिष्ठ वर्गांच्या सामाजिक-राजकीय जीवनात त्यांना ऐदीपणा, खाबूगिरी, स्वैर लंपटपणा, क्रौर्य यांचे नागडे प्रदर्शन आढळत होते. धर्माच्या क्षेत्रातही पुरोहितवर्ग करीत असलेली लुबाडणूक उबग आणणारी होती. भटजी-पुजारी यांचे, धार्मिक मठांमधील संन्याशांचे व्यक्तिगत जीवनदेखील स्वार्थलोलूप, लंपट व ऐदी बनलेले होते. युरोपातील प्रोटेस्टंट चळवळ ही या कर्मक्षेत्रातील अनाचाराविरुद्धचीच मोठी चळवळ होती. भांडवलशाहीचे प्रवर्तन करणाऱ्या बूर्झ्वा वर्गास प्रामाणिक व शिस्तशीर जीवनावर आधारलेल्या सुसंस्कृत, नैतिक मानवी जीवनाची आस होती. स्वकष्टार्जित धन हाच नव्या वैयक्तिक व सामाजिक व्यवस्थेचा मुख्य आधार होऊ शकतो, खानदानी वर्गांची ऐदी श्रीमंती ही भ्रष्ट व अनीतिमान जीवनालाच जन्म देऊ शकते, अशी त्यांची ठाम धारणा होती.

सुसंस्कृत व नैतिक मानवी जीवनाची निर्मिती करण्याचे काम कुटुंबाच्या

परिघातच होऊ शकत होते अशी त्या वेळची स्थिती होती ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी. कारण बाहेरच्या जगात सामंतशाहीचाच वरचष्मा होता. ज्या थरांतून बूर्झ्वा वर्गाचा उदय/उत्कर्ष झाला, त्या थरांमध्ये खानदानी कुलांचे अस्तित्व तर नव्हतेच पण पूर्वीच्या टोळीसमाजाची कुलाधिष्ठित रचनाही सामंतशाहीच्या आघाताखाली कधीच नष्ट झाली होती. किंबहुना, कुटुंब व लग्न यांचेही अस्तित्व तोंडदेखलेच ठरावे इतकी वाताहत आढळत होती. त्यामुळे नवरा-बायको व मुले यांनी मिळून बनणाऱ्या सुट्या कुटुंबावरच सारा भर आला.

कुटुंब ही जणू अभेद्य गढी अशी इंग्लिश धारणा व रचना असल्याचे आपण ऐकतो त्याची ही पार्श्वभूमी आहे. तळागाळातले कुटुंबविहीन अवस्थेतील पशुवत मोकाट लैंगिक संबंध व खानदानी थरातले कुटुंबाची थट्टा मांडणारे भोगविलासी स्वैर लंपट जीवन, त्यांतून होणारी स्त्रीची विटंबना थांबवायची असेल तर कुटुंब नावाच्या गढीची अभेद्य अशी उभारणी करून तिच्यात लग्नसंबंधाद्वारे प्रवेश दिलेल्या स्त्रीची गृहस्वामिनी, (मुलांची) माता, सुसंस्कृत मानवी जीवनाचा केंद्रबिंदू म्हणून प्रतिष्ठापना करणे अगत्याचे आहे, असा बूर्झ्वा वर्गाच्या धुरिणांचा एकप्रकारे जाणीवपूर्वक निर्णय होता.

आर्थिक सुस्थितीत आलेल्या कुटुंबातील स्त्रीने काबाडकष्टाची उत्पादक कामे करावयाची नसतात ही प्रथा जित-जेत्या संबंधांवर आधारित नागर समाजातच पडलेली होती. धर्मपत्नी ही औरस प्रजा उत्पन्न करण्यासाठी, गुलाम स्त्रिया शरीरसुखासाठी, आणि कलावंतिणी काव्यशास्त्रविनोदनासाठी अशी 'श्रमविभागणी' अभिजात ग्रीक संस्कृतीच्या कालखंडातच अस्तित्वात आलेली होती. याला समांतर अशा घडामोडी भारतीय इतिहासातही पहावयास मिळतातच. या पार्श्वभूमीवर विचार करता, भांडवलशाही व्यवस्थेने स्त्रीला घरात कोंडून घातले या प्रकारचा आरोप असमंजस ठरतो. खरे तर असे आहे की, नागर समाजव्यवस्थेत वरिष्ठ वर्गामधील स्त्रीला पूर्वापार ज्या अप्रतिष्ठित अवस्थेत ढकलले गेले होते तीमधून तिला मुक्त करून, सहचरी, गृहस्वामिनी, माता, नैतिकतेची आधारशिला अशा वेगवेगळ्या भूमिका बहाल करून, तिला सुप्रतिष्ठित करण्याचा थोर प्रयत्न भांडवलशाहीच्या प्रवर्तकांनी केला. स्त्रीची प्रतिष्ठापना देव्हाऱ्यात करून तिची पूजा करण्याची ही भूमिका दांभिक नव्हती.

या भूमिकेतला प्रामाणिकपणा व या भूमिकेने स्त्रीच्या पदरात जे टाकले त्याचे मोल जाणण्याचे एक साधे गमक आपल्या हाताशी आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील व विसाव्या शतकातील पहिल्या दोन दशकांमधील सुधारकी घरातल्या स्त्रीला मिळणारी वागणूक, तिला मिळणारी संधी, सुधारकी घरातले वातावरण

आणि त्याच काळातील सनातनी कुटुंबातल्या स्त्रीचे जीवन यांची तुलना केल्यास स्त्रीच्या स्थितीतील सुधारणा लक्षात येऊ शकेल. ग्रामीण मराठा समाजातील स्वत:स 'खानदानी' मानणाऱ्या घरातील स्त्रीचे जीवन आणि त्याच घरातील तरुण मुलगा शिकून पांढरपेशा बनून शहरात सुधारकी वळणाचे घर थाटतो तेव्हा त्याच्या घरातल्या त्याच्या बायकोच्या वाट्यास येणारे जीवन यांचीही तुलना करण्यासारखी आहे. बूर्झ्वा कुटुंबाच्या चौकटीत स्त्रीच्या स्थितीत घडून येणारी प्रचंड सुधारणा व तिची मौलिकता लक्षात यायच्या दृष्टीने आणखी एक तुलना करता येईल. सधन स्थितीतील पारंपरिक वळणाच्या जैन-मारवाडी घरातली स्त्री आणि जुने वळण टाकून सुधारकी बनलेल्या त्याच समाजातील तरुण पिढीच्या घरातली स्त्री यांची तुलना करा.

आणि तरीही सामान्य सुधारकी, सुशिक्षित पांढरपेशा घरातल्या सुशिक्षित स्त्रीची बंदिवासामधून सुटका झालेली नसते. मात्र ती घराबाहेर पडून अर्थार्जन करीत नाही म्हणून बंदिवास चालू राहिलेला असतो अशी वस्तुस्थिती नाही. घराबाहेर पडून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रिया कष्टकरी थरांमध्ये सदैवंच राहत आल्या आहेत. पण स्त्रीचे म्हणून जे विशिष्ट स्वरूपाचे दास्य आहे त्यामधून त्यांची सुटका झालेली नाही. आज नोकरी-चाकरी करणाऱ्या पांढरपेशा विवाहित स्त्रियांची संख्या पुष्कळ मोठी आहे. अर्थार्जन करतात या कारणाने त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतात असेही म्हणता यायला हवे, पण स्वाश्रयी व स्वावलंबी वृत्तीच्या स्त्रिया अपवादानेच आढळतात.

एक काळ असा होता की, लग्न ही जन्माची गाठ मारली जाते, घटस्फोट मिळणे फार दुरापास्त असते हे स्त्रीच्या दास्यत्वाचे प्रमुख कारण समजले गेले. स्त्री अर्थार्जन करून स्वत:च्या पायावर उभी राहिली, आणि तिच्या मनात आल्यावर तिला घटस्फोट घेता आला, तर पुरुष तिच्यावर सत्ता गाजवू शकणार नाही. पांढरपेशा उच्चवर्णीयांमध्ये, 'खानदानी' कुळांमध्ये घटस्फोट अशक्य होता तेव्हाही समाजातल्या कनिष्ठ व कष्टकरी वर्गांमध्ये, जातिजमातींमध्ये काडीमोड सहजी मिळू शकत असे, व त्या स्त्रियांपाशी कष्ट करून स्वत:चे पोट भरण्याची क्षमताही होती. पण त्याही वर्गातील स्त्रियांना 'कुंकवाच्या धन्यां'चा आधार असला तर हवा असतो, व त्यासाठी पुष्कळ काही सोसायला त्या तयार असलेल्या आढळतात.

बंदिवासात आहेत / असतात म्हणते काय? स्वत:च्या व्यक्तित्वाची स्वतंत्रपणे जोपासना करणे, आपला पेशा निवडून त्याला वाहून घेणे, आपले मैत्रीसंबंधांचे स्वतंत्र विश्व निर्माण करणे, सार्वजनिक जीवनात जबाबदार सक्रीय सहभाग घेणे या गोष्टी नवरा कसा मिळतो यावर अवलंबून आहेत हे माहीत नसल्याने स्त्रिया लग्न

होऊन चित्र स्पष्ट होईतोवर सगळे निर्णय स्थगित ठेवतात. लग्नानंतरही, वेगळेपणाने काही करावयाचे तर नवऱ्याची संमती व प्रोत्साहन आवश्यक असते. ते नसेल तर आपला निर्णय आपण करणे व स्वतंत्र वाट चोखाळणे ही गोष्ट स्त्री सहसा करू धजत नाही. कारण तिला लग्न करून आपण कोणती बंधने स्वीकारली आहेत, त्यांना आपली मूक संमती दिली आहे याची मनोमन कल्पना असते.

लग्न मोडून, संसार व मुले वाऱ्यावर सोडून स्वतंत्र होण्याची स्त्रीला आज मोकळीक आहे. वा कुमारिका राहून स्वत:चा मार्ग चोखाळण्याचेही स्वातंत्र्य तिला आहे. पण ही मोकळीक व हे स्वातंत्र्य घेण्यासाठी, असामान्य धैर्य प्रगट करावे लागते. कारण समाजाला आव्हान देऊनच या गोष्टी तिला एक प्रकारे कराव्या लागतात. त्यातही, घटस्फोटितेस वा कुमारिकेस समाजात प्रतिष्ठेने वावरावयाचे असेल तर, पुरुषांशी (लैंगिक संबंधासह) मैत्री कटाक्षाने टाळावी लागते; समाजाच्या कल्पनेप्रमाणे तिचे शील तिने जपले पाहिजे असा प्रचंड दबाव व्यावहारिक पातळीवर असतो.

अलीकडच्या काळात उच्चभ्रू समाजात काही स्त्रियांनी समाजाला आव्हान देऊन बंडखोर जीवन जगण्याची गोष्ट अपवादादाखल केली आहे. पण अपवादाने नियमच सिद्ध होतो.

१३

पाश्चात्त्य देशांमध्ये अलीकडच्या पंचवीस-तीस वर्षांमध्ये उद्भवलेल्या स्त्रीमुक्ती चळवळीने पुरुषसत्ताकतेला स्त्रीसत्ताक विचारप्रणालीची बांधणी करून शह देण्याचा प्रयत्न केला. याच भूमिकेचा एक भाग म्हणून पुरुषांशिवाय स्वयंपूर्ण असे जीवन जगण्याचेही आग्रहाने प्रयोग केले गेले. लग्नसंस्थेविरुद्ध बंड पुकारले गेले. स्त्री-मुक्तीचळवळीने खळबळ खूप माजली पण सर्वसामान्य स्त्रीच्या दृष्टीने परिस्थितीत फार फरक पडल्याचे दिसत नाही.

अगदी आपल्या देशातली स्थिती पाहिली तरी बलात्कार, हुंडा, जळिताची प्रकरणे, स्त्रियांवरील अत्याचार, इत्यादी मुद्दे लावून धरले गेले आहेत. याच्या जोडीने प्रचलित आर्थिक व्यवस्थेच्या चौकटीत व्यक्तिवादी उदारमतवादी तत्त्वांची काटेकोर अंमलबजावणी करून नोकऱ्या, पगार, कामाच्या शर्ती, मातृत्वाच्या संदर्भात विशेष सेवा-सवलती-सोयी या बाबतींत स्त्रियांना पूर्णतया समान व काही बाबतींत न्यायाच्या भूमिकेतून झुकते माप मिळावे यासाठी दबाव आणला जात आहे. स्त्रियाच्या प्रश्नांच्या संदर्भातल्या स्त्रीविशिष्ट ट्रेडयुनियन चळवळ असे काहीसे स्वरूप प्राप्त झालेले आहे. या सर्व मुद्द्यांवरून आज जे कार्य चालले आहे ते

मोलाचे आहे. पण स्त्री-पुरुष समानता व स्त्री-मुक्ती यांसाठी समाजरचनेत जे मूलभूत परिवर्तन घडून यायला हवे ते घडून येणार नाही.

लग्नप्रथा मुळात जेव्हा अस्तित्वात आली तेव्हा समाजधुरीणत्व निर्णायकरीत्या व मूलत: पुरुषांच्या हाती आले. पुढे पुरुषसत्ताक व्यवस्था प्रस्थापित झाली तेव्हा स्त्रीकडे आलेल्या, (i) पुरुषाचा वंश वाढविण्यासाठी कूस उजविणारी पत्नी, (ii) पुरुषाला शरीरसुख देणारी बाजारबसवी / दासी, व (iii) काव्यशास्त्रविनोदनाने पुरुषाचे रंजन करणारी कलावंतीण / चतुर ललना या तीन भूमिकांमुळे समाजधुरीणत्वामध्ये सहभाग देण्याच्या दृष्टीने ती आणखीनच दूर गेली. मानवी समाज हा जर स्त्री-पुरुषांचा मिळून बनणारा समाज आहे तर त्याचे धुरीणत्वही उभयतांकडे समानत्वाने असले पाहिजे. नोकऱ्याचाकऱ्या, सांस्कृतिक समारंभ व 'सोशल लाईफ' यांमधील स्त्रियांची संस्था / सहभाग वाढविण्याचा हा प्राधान्याने मुद्दा नाही. समाजासंबंधीचे निर्णय जेथे केले जातात, समाजाचा गाडा चालविण्याची जबाबदारी जेथे अंगावर घेतली जाते अशा जागी व प्रक्रियेत आणि या अर्थाने सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा बरोबरीचा सहभाग निर्माण होणे, करणे हा खरा मुद्दा आहे.

आज प्रचलित असलेली लग्नसंस्था याच्या आड येते. पण लग्नसंस्थाच मोडीत काढणे हा यावर उपाय होऊ शकत नाही. कारण बहुतांश स्त्रियांना पुरुषसुखाची, मुलांची, संसाराची स्वाभाविक ओढ राहणारच, व स्त्री-पुरुष दोघांच्याही दृष्टीने लग्न व कुटुंब या दोन्ही रचना / संस्था सोयीच्या आहेत. सार्वजनिक जीवनात सहभागी होणे, स्वत:च्या स्वतंत्र व्यक्तित्वाची, पेशाची व जीवनाची जोपासना करणे यांविषयी आग्रही असणाऱ्या स्त्रीने, एवढी हौसच असेल तर प्रौढ कुमारिकेचे आयुष्य कंठावे अशी समाजाची अलिखित भूमिका होती. अनेक स्त्रियांना मातृत्वाची ओढ नसते, संसाराचीही कटकट वाटते. लैंगिक सुखावर पाणी सोडणे त्यांना फार कष्टाचे वाटत नसे. अशा स्त्रियांसाठी आज फारसे अडथळे उरलेले नाहीत. कारण स्त्रीने लग्नाशिवाय राहणे हा अगोचरपणा आहे, विकृती आहे असे समाज आता मानीत नाही. पण संसारी, कुटुंबवत्सल स्त्रीचाही हा जन्मसिद्ध हक्क आहे, नव्हे ते मानव म्हणून, समाजघटक म्हणून तिचे कर्तव्य आहे, तिच्या जीवनाचेही श्रेयस त्याच्यात आहे हे समाजाकडून मान्य होऊन लग्न व कुटुंबसंस्थांना अनुरूप लवचीक घाट प्राप्त होणे स्त्री-पुरुष समानता व मुक्ती या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

आपला हा जन्मसिद्ध हक्क असून तो आपण मिळविणार, उपभोगणार असे म्हणणारी स्त्री लग्न करावयाचे झाल्यास कोणत्या गोष्टींचा आग्रह धरेल? कोणती पथ्ये सांभाळेल? कशा प्रकारचा संसार थाटेल?

दोन स्वतंत्र मनाच्या समान व्यक्ती आपापली स्वायत्त व्यक्तित्वे जोपासत, आपापले पेशे जगत जीवन कंठण्याच्या ओघात स्वेच्छेने एकत्र घर करतात, मुले जन्माला घालण्याची व त्यांना वाढविण्याची गोष्ट करतात तेव्हा, परस्परांशी जुळवून घेताना अनेक ठिकाणी स्वत:ला मुरड घालून घ्यावी लागेल, देवाण-घेवाणीचा समंजसपणा दाखवावा लागेल हे त्यांना गृहीत धरावे लागतेच. एकत्र राहण्यात परस्परांनी बांधले जाण्याचा बंधनाचा भाग अटळपणे येतोच. मुले जन्मास घालावयाची, त्यांचे योग्य संगोपन करावयाचे म्हणजे तर या जबाबदारीमुळे येणारी योग्य बंधने व मर्यादा स्वीकारणेही आलेच. याची पूर्ण जाणीव ठेवून, बंधने, मर्यादा, तडजोडी यांच्या पलीकडील श्रेयासाठी स्वेच्छेने दोघांनी लग्नाचा निर्णय घेतलेला असेल हे गृहीत असेल.

स्वत:चे स्वतंत्र व्यक्तित्व व पेशा जोपासण्यात लग्नँ, संसार, मुले ही आडकाठी न होईल या प्रकारे कुटुंबासाठी अर्थार्जन, घरकाम, अपत्यसंगोपन, या क्षेत्रातल्या कामाचे व जबाबदाऱ्यांचे वाटप प्रथमपासून व कायमच करण्याविषयीचा कटाक्ष, मैत्रीसंबंधांच्या स्वायत्त विश्वाच्या जपणूक व संवर्धनाचा अधिकार, आणि पारंपरिक अर्थाने परस्परांना अव्यभिचारी एकनिष्ठा वाहण्यास (यात अध्याहृत असलेल्या लैंगिक निर्बंधासह) जाणीवपूर्वक दिलेला नकार या तीन गोष्टींना समाज व मुक्त भूमिकेमधून परस्परांच्यात सहजीवन व आत्मीय बंधुभाव फुलण्याच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्व आहे.

१४

वरीलपैकी तिसऱ्या मुद्द्याची थोडी स्पष्टता करावयास हवी. लैंगिक संबंधाचा विषय हा नाजूक व स्फोटक बनवलेला आहे. यातला पुरुषी दुटप्पीपणा आपण पाहिला आहे. स्वैर कामोपभोगास ('फ्री सेक्स') प्रोत्साहन असा याचा अर्थ लावण्याची घाई होते व भुई थोपटली जाते. व्यक्तित्व व पेशा यांच्या जोपासनेचे गंभीर व अत्यंत खडतर असे ध्येय बाळगून जीवन जगणाऱ्या, सार्वजनिक जीवनात जबाबदारीने सहभागी होणाऱ्या आणि पुरुषसत्ताक वा स्त्रीसत्ताक संबंध प्रस्थापित करण्याच्या व जगण्याच्या भूमिकेतून स्वत:च मुक्त केलेल्या स्त्रीपुरुषांना स्वैर कामोपभोगी संबंध आपल्या भूमिकेशी व ध्येयासाठीच्या धडपडीशी विसंवादी आत्मघातकी असल्याचे प्रत्ययाला येते. तिसऱ्या मुद्द्याचा खरा अर्थ असा आहे की, एकमेकांवर वा एकमेकांकडून मक्तेदारी गाजविण्यास नकार. लैंगिक संबंध हे अशा मक्तेदारी हक्काचा भाग करण्यासही त्यात नकार अभिप्रेत आहे.

स्त्री-पुरुषांमधले लैंगिक आकर्षण व संबंध ही एका अंगाने, प्राणिपातळीवरील

गोष्ट आहे व ती त्या पातळीवरील निसर्गनियमानुसार स्त्री-पुरुषामध्ये सदैव क्रियाशील राहणार. सामाजिक उद्दिष्टांना अनुरूप असे त्यांचे नियमन जाणीवपूर्वक करूनच माणूस त्यांना मानवी व सुसंस्कृत रूप देऊ शकतो. ही गोष्ट खरी; पण सामाजिक उद्दिष्टे व्यक्तिगत स्त्री-पुरुषांच्या व्यक्तित्वांचा, भावनांचा अनादर करणारी ठरली न पाहिजेत. लग्नाच्या आधारे नवऱ्यास पत्नीवर (प्रसंगी बायकोस नवऱ्यावर) लैंगिक संबंध लादण्याचा मक्ता हा स्त्रीचा अनादर करणारा आहे. प्रचलित लग्नसंस्थेवरचा हा एक मोठा गंभीर आक्षेप आहे. दुसऱ्या बाजूला, परस्परांशी विवाहित नसलेल्या व्यक्तींमध्ये भावमधुर आकर्षणापोटी लैंगिक संबंध जुळून आल्यास ती गोष्ट अनैतिक, पापी मानली जाते. तुलनेने, पैसे टाकून वा लोभात पाडून स्त्रीसुख उपभोगले तर त्या गोष्टीला समाजाची मान्यता आहे. वास्तविक पाहता सामाजिक संस्कार, शिकवणूक, नियमन यांचे उद्दिष्ट असे असायला हवे की, स्त्री व पुरुष यांपैकी कोणीही केवळ स्वत:ची इच्छा वा लहर आहे म्हणून, स्वत:जवळ बळ आहे म्हणून दुसऱ्यावर दबाव आणता येतो, वश करता येते, फसविता येते, लोभात पाडता येते, विकत घेता येते म्हणून दुसऱ्याला भोगवस्तू बनवून सुख ओरबाडून घेऊ नये, ही धारणा पक्की रुजेल व तीनुसार समाजव्यवहार घडेल त्याच वेळी, परस्परांविषयी भावनात्मक जवळीक, प्रेम असेल तेव्हा परस्परांविषयीचे शारीर आकर्षण ही हृद्य व सुंदर गोष्ट असते, अशा वेळी घडून येणारा लैंगिक संबंध हा दोघांनाही सुख देणारा तर असतोच पण दोघांनाही अधिक सुसंस्कृत व उन्नत करणारा असतो, ही धारणाही स्त्री-पुरुषांमध्ये रुजविण्याची आवश्यकता आहे.

नागर समाजपूर्व आदिवासी टोळी समाजामधील स्त्री-पुरुष संबंधांमध्ये, बलात्कार ही समस्या आढळत नाही, वेश्याव्यवसायाची गरज भासत नाही, स्त्रिया सतत भयग्रस्त आढळत नाहीत, या गोष्टी ध्यानात घेण्यासारख्या आहेत. या संस्कृतीमधील स्त्री-पुरुष स्वत:च्या ठायीची कामेच्छा सहजपणे स्वीकारतात, समाजाकडून होणारे तिचे नियमनही स्वीकारतात, पण अशा निर्बंधांनी स्त्री-पुरुष संबंधांचा व्यवहार पूर्णपणाने कधी नियमित होऊ न शकण्याइतकी कामेच्छा व स्त्री-पुरुषांना परस्परांविषयी वाटणारी ओढ प्रबळ असते हा समंजस विवेकही त्यांच्यात मुरलेला आढळतो. आदिवासी स्त्री-पुरुष, विशेषत: विवाहित स्त्री-पुरुष, स्वैर भोगविलासी जीवन जगत नसतात. उलट, स्त्रीच्या विवाहपूर्व व विवाहबाह्य लैंगिक संबंधांना अनैतिक, पापी ठरवून ते संबंध दडपून टाकणाऱ्या नागर समाजातच स्त्री-पुरुष संबंध अधिक रोगट, विकृत व निर्दय असल्याचे आढळते. यातून आवश्यक तो बोध घ्यायला हवा.

आदिवासी टोळी जीवनाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रश्न नाही. समाजव्यवहारांची गुंतागुंत तर आज अनेक पटींनी वाढलेली आहेच. पण ज्ञान-अज्ञानातील प्रगतीमुळे

आज माणसाचे स्वत:विषयीचे भान (सेल्फ-कॉन्शन्स) तीव्र झाले आहे. आदिवासींच्या नैसर्गिक सहजतेने जगणे त्याला आज शक्य नाही. यापुढची वाटचाल त्याला अधिकच समंजसपणे, विवेकाने व डोळसपणे करायला हवी आहे.

स्त्रियांनी प्रौढपणी सार्वजनिक जीवनात व आर्थिक व्यवहारामध्ये समानत्वाने सक्रिय सहभाग घ्यावा अशी इच्छा-अपेक्षा आपण बाळगीत आहोत. स्त्री-पुरुष एकमेकांच्या सहवासात, खांद्याला खांदा लावून कामे करण्याचे प्रमाण वाढेल असा याचा अर्थ. निसर्ग आपले काम करील, म्हणजे स्त्री-पुरुषांना परस्परांचे आकर्षण पडेल व लैंगिक मीलनाची ओढ उत्पन्न होईल, हा या घडामोडीचा परिणाम गृहीत धरला पाहिजे. स्वत:च्या ठायी असलेल्या प्रबळ नैसर्गिक कामवासनेविषयी भयगंड बाळगणारे पण त्याच वेळी तिच्या विकृत प्रभावाखाली असलेले स्त्री-पुरुष वरील आव्हान सुसंस्कृतपणे पेलू शकणार नाहीत. नागर समाजाच्या आजवरच्या वाटचालीत स्त्री-पुरुषांच्या ठायी वरील मानसाचे रोपणच केले गेले आहे. स्त्रीची दडपणूक, तिचे लैंगिक शोषण व स्वैराचार ही फलनिष्पत्ती मग अटळ होती. प्रबळ कामवासना निसर्गत: आपल्या अंतरी का उपस्थित असते याची वैज्ञानिक समज बाळगून, कामवासना असते या सत्याचा अविकृतपणे स्वीकार करून व तिच्या प्रमाथी बलदंडपणाचे भान राखून तिचे डोळसपणे आत्मनियमन करू शकणारे स्त्री-पुरुषच भावी काळ घडवू शकणार आहेत, घडविणार आहेत.

मानवजातीचे वंशसातत्य टिकून राहावे म्हणून आवश्यक तेवढे प्रजोत्पादन करण्यासाठी इतकी प्रबळ कामवासना सर्वांच्या ठायी असण्याची गरज संपुष्टात आलेली आहे. मानवी समाजाच्या व संस्कृतीच्या भावी वाटचालीत भरपूर प्रजोत्पादन हे कामवासनेचे प्रयोजन राहणार नसून, सहृदयता, प्रेम, बंधुभाव, करुणा यांचा परिपोष व यांची अभिव्यक्ती स्त्री-पुरुष मैत्रीसंबंधाद्वारे होत राहावी हे तिचे कार्य राहणार आहे. तसे घडले तरच मानवजातीचा विनाश टळेल असेही सार्थपणे म्हणता येईल.

असा मैत्रीसंबंध सामान्यत: व बव्हंशी विवाहांतर्गत व कुटुंबाच्या गोतावळ्यात पती-पत्नीमध्ये असेल व असावा असे आपण म्हणू. पण विवाहपूर्व व विवाहबाह्य स्त्री-पुरुष मैत्रीसंबंध यांनाही भावी समाजव्यवस्थेत प्रतिष्ठित व मानाचे स्थान राहील हे जाणण्याची, स्वागतशील मनाने त्यांचा स्वीकार करण्याची वेळ आलेली आहे.

पुस्तक पंढरी, दिवाळी १९८६

◆